दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-१७८ रविवार, दि.२० ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मान्सूनची एक्झिट...

मागील चार महिन्यांच्या दमदार पर्जन्यवृष्टीनंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अखेर देशातून निरोप घेतला आहे. त्यामुळे पावसाळा संपला, असे म्हणायला आता हरकत नसावी. मोसमी पाऊस हे भारतासारख्या देशाला लाभलेले वरदान आहे. येथील ६० ते ६५ टक्के लोकसंख्या ही आजही शेती वा शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. स्वाभाविकच कृषी अर्थव्यवस्था हा भारतीय अर्थकारणाचा महत्त्वाचा गाभा आहे.

साधारणपणे जून ते सप्टेंबर हा पावसाचा हंगाम मानला जातो. अंदमान वा केरळमध्ये मान्सूनचा प्रवेश झाल्यानंतर खऱ्या अर्थाने पावसाला सुरुवात होत असल्याचे मानले जाते.

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया रहाटकर

दिल्ली : राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया किशोर रहाटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर डॉ. अर्चना मजुमदार यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या नवीन सदस्या म्हणून निवड केली आहे. याबाबतची अधिसूचना महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने जारी केली आहे. राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० च्या कलम ३ अंतर्गत करण्यात आलेली ही नियुक्ती तीन वर्षांच्या कालावधीसाठी अथवा त्यांच्या वयाच्या ६५ वयापर्यंत असेल, असे शनिवारी जारी करण्यात आलेल्या सरकारी अधिसूचनेत म्हटले आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटविला होता. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने त्यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

# महाराष्ट्र, झारखंडच्या प्रचारात संयुक्त किसान मोर्चा उतरणार!

## भाजप सरकार विरोधात शेतकऱ्यांमध्ये करणार जागृती; सरकारच्या धोरणाला विरोध

**मुंबई । प्रतिनिधी**

**संयुक्त किसान मोर्चाने २६ नोव्हेंबर रोजी देशातील ५०० जिल्ह्यांमध्ये चेतावणी रॅली काढण्याची घोषणा केली आहे. २०२० मध्ये तीन कृषी कायद्यांविरोधात दिल्ली येथे आयोजित चौथ्या वर्धापन दिनानिमित्त निषेध केला जाईल. यासोबतच महाराष्ट्र, झारखंडच्या प्रचाराचात भाजपला संयुक्त किसान मोर्चा विरोध करेल असाही निर्णय सुरजित भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.**



संयुक्त किसान मोर्चाच्या बैठकीत केंद्र सरकार डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन (डॅम) च्या माध्यमातून शेती कॉर्पोरेट्सच्या ताब्यात देत आहे. या धोरणास विरोध करण्यात आला. तसेच सरकार फक्त कॉर्पोरेट्स यांच्या मागे उभे राहत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याचमुद्द्यावर केंद्र सरकारचा निषेध एसकेएमने केला आहे. तर डिजिटल कृषी मिशन शेतीचे कॉर्पोरेटीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व प्रस्थापित करेल, असाही दावा एसकेएमने यावेळी केला. एसकेएमने महाराष्ट्र आणि झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपविरोधात शेतकऱ्यांमध्ये प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी सभेत अनेक गोष्टींवर चर्चा करण्यात आली. हेच मुद्दे आता चेतावणी रॅलीतून जनतेच्या समोर नेण्यात येणार आहेत. या बैठकीत जगमोहन सिंग, हन्नान मोल्ला, राजन क्षीरसागर, पद्मा पश्याम, जोगिंदर सिंग नैन, सिदगौडा मोडगी आणि डॉ. सुनीलम यांचा समावेश होता. या मागण्यांची वेळेत अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या मागण्या वेळेत पूर्ण न केल्यास भाजपविरोधात वज्रमुठ बांधू असा इशारा, दिला आहे. तर शेतकरी विरोधी भाजपला धडा शिकवण्यासाठी देशभरातील शेतकऱ्यांनी एकत्र यावे असेही आवाहन एसकेएमने केले आहे.

### २६ नोव्हेंबरला ५०० जिल्ह्यांमध्ये चेतावणी रॅली

२६ नोव्हेंबर रोजी देशातील ५०० जिल्ह्यांमध्ये आयोजित चेतावणी रॅलीत अधिकाधिक शेतकरी आणि शेतकरी हितचिंतकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन एसकेएमकडून करण्यात आले आहे. तर कामगार संघटना आणि शेतमजूर संघटनांच्या सहकार्याने ही रॅली काढण्यात येईल. यावेळी शेतकऱ्यांच्या मागण्यांसोबतच मजूर, शेतमजूर आणि मजदूर शेतकऱ्यांच्या मागण्याही मांडल्या जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### केंद्र सरकारला तीन महिन्यांचा अल्टिमेटम

एसकेएमच्या सर्वसाधारण सभेत केंद्र सरकारला तीन महिन्यांचा अल्टिमेटम देण्याचा ठराव घेण्यात आला. सर्व पिकांची हमीभाव खरेदी, सी २ उत्पादन खर्चावर ५० टक्के नफ्यासह हमीभाव जाहीर करावा, हमीभावाने पीकांची शाश्वती, शेतीवरील कॉर्पोरेट कब्जाच्या धोरणांविरोध आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी या मागण्या देखील आधीच केंद्र सरकारकडे पाठवण्यात आल्या आहेत.

# अनेक मतदारसंघात दहा हजारांवर मतदार गायब

## सगळ्याचे सूत्रधार चंदशेखर बावनकुळे; महाविकास आघाडीचा गंभीर आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील १५० मतदारसंघ ठरवून एका ॲपच्या माध्यमातून दहा हजार मते काढून टाकून त्या ठिकाणी बोगस मतदार नोंदणी होत असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीने केला आहे. हे कटकारस्थान करणारे सूत्रधार भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे असल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. दरम्यान, ज्या मतदारसंघांमध्ये मतदार यादीमध्ये गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे ते मतदारसंघ महाविकास आघाडीच्या नेत्यांनी समोर आणल्याचा दावा केला आहे. जर हा प्रकार थांबला नाही तर आम्ही या विरोधात मोर्चा काढू असा इशारा सुद्धा महाविकास आघाडीने दिला आहे.

शुक्रवारी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून मतदारयादींमध्ये होत असलेल्या गोंधळाविरोधात निवडणूक आयोगाकडे दाद मागण्यात आली होती. या संदर्भाने शनिवारी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून मतदारयादीमध्ये कशा




पद्धतीने गोंधळ घातला जात आहे, या संदर्भातील माहिती दिली. खासदार संजय राऊत म्हणाले की, महायुतीवाल्यांना आम्ही लफंगे म्हणतो. एक प्रकारे ते पराभवाला घाबरले असल्याने लोकशाही विरोधात मोठे कट कारस्थान केले जात आहे. त्या अनुषंगानेच आम्ही निवडणूक आयोगाला भेटलो होतो, असे संजय राऊत यांनी सांगितले. शिर्डी, चंद्रपूर, आर्वी, कामठी, कोथरूड, गोंदिया, अकोला ईस्ट, चिखली, नागपूर, कणकवली, खामगाव, चिमूर आणि धामणगाव या मतदारसंघात मतदार यादीत गोंधळ असल्याचा आरोप महाविकास

◀◀ पान २ वर

### एका गावात २८४४ मतदार कसे वाढतात?

शिर्डीमधील लोणी गावांमध्ये २८४४ मते लोकसभेनंतर वाढवण्यात आली आहेत. मुसलमान, बौद्ध यांची मते कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप सुद्धा नाना पटोले यांनी केला. ते म्हणाले की मतदार म्हणून तुम्ही सतर्क झाला पाहिजे. आपले मतदान बरोबर आहेत की नाही हे तपासले पाहिजे. निवडणूक आयोगामधील काही अधिकारी भाजपच्या आदेशाने काम करत असल्याचा आरोप सुद्धा त्यांनी केला. दहा ते पंधरा हजार मतदारांची नावे कमी करण्याचा प्रयत्न होत आहे आणि त्या बदल्यामध्ये बाहेरील राज्यातील मतदार वाढवले जात आहेत. एका दिवसात २८४४ मतदार कसे वाढतात? अशी विचारणा सुद्धा त्यांनी केली.

### कटकारस्थान करून भाजप पुन्हा एकदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करतेय

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, शिर्डी, चंद्रपूर, अकोला, नागपूर, चिमूर, धामणगाव या ठिकाणी मतदार यादीत गोंधळ केला गेला आहे. निवडणूक आयोग सरकारचा कठपुतळी झाल्याचा आरोप सुद्धा त्यांनी केला. हा सर्व प्रकार धकादायक असून लोकशाही संपवणारा आहे. त्यामुळे मतदार यादी चेक कराव्यात. भाजप कटकारस्थान करून पुन्हा एकदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे त्याची कल्पना मित्र पक्षांना सुद्धा नसल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

# परळी नगर पालिकेने सर्वसामान्य जनतेला लावला १०० कोटिंना चुना!

परळी । प्रतिनिधी

परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास १०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करापोटी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून, हेच पैसे जनतेला परत करा





### जनहितासाठी राजेभाऊ फड सरसावले उच्च न्यायालयात केली याचिका

व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात पुढील सुनावणी येत्या २७ तारखेला ठेवण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणताही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही

◀◀ पान २ वर

# आज राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलन

## उदगीरमध्ये जमणार राज्यभरातील पत्रकारांचा मेळा

**उदगीर । प्रतिनिधी**

**येथील रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्यावतीने रविवारी (दि २०) रोजी पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनात राज्यभरातील पत्रकार साहित्यीक हजेरी लावणार असून दिवसभर उदगीरकरांना बौद्धिक व सांस्कृतिक मेजवानी मिळणार आहे.**

सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संमेलन स्थळ संविधान दिंडी निघणार आहे. यानंतर उद्घाटन सोहळा मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या हस्ते पार पडणार आहे. संमेलन अध्यक्ष म्हणून सोलापूर येथील आहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या पत्रकारीता विभागाचे माजी प्रमुख ज्येष्ठ पत्रकार डॉ. रवींद्र चिंचोलकर हे उपस्थित राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष म्हणून मंत्री संजय बनसोडे हे उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, माजी खासदार सुधाकर शृंगारे, शरद पाबळे, बसवराज पाटील नागराळकर, मिलींद आष्टीवकर, दिलीपकुमार गायकवाड, अनिल वाघमारे, डॉ. सुधीर जगताप, नृसिंग घोणे, पृथ्वीराज पाटील एकंबेकर, अमित बापूराव राठोड यांची उपस्थिती राहणार आहे. दुपारी संपादक व्यंकटराव सगर वृतनिवेदक विलास बडे यांच्या अध्यक्षतेखाली आधुनिक काळातील पत्रकारांपुढील आव्हाने हा परिसंद होणार आहे. पत्रकार दिलीप वाघमारे, सुनील क्षीरसागर, माधव सावरगावे, चेतन धनुरे, विनायक चाकूरे, एजाज शेख आदी सहभागी होणार आहेत. यानंतर संपादक, कवी लक्ष्मीकांत हलकीकर, पंकज

◀◀ पान २ वर

## निवडणूक आयोगाने झारखंडच्या पोलीस महासंचालकांना हटवले

नवी दिल्ली । वृत्तसेवा

केंद्रीय निवडणूक आयोगाने झारखंडचे पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांना पदावरुन तत्काळ हटवण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोगाने अनुराग गुप्ता यांच्या जागी त्या विभागात उपलब्ध असलेल्या सर्वात वरिष्ठ डीजीपी स्तरावरील अधिकाऱ्याला जबाबदारी देण्यात यावी, असे निर्देशही दिले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, झारखंड पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांना पदावरुन तत्काळ हटविण्यात यावे. त्यांच्या जागी कॅडरमध्ये सर्वात वरिष्ठ अतिरिक्त पोलीस महानिरीक्षकांकडे पदभार सोपविण्यात यावा. राज्य सरकारला या सूचनांचे शिस्तपालन अहवाल शनिवारी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सादर करण्यास सांगण्यात आले. गुप्ता यांच्या विरोधात आयोगाने मागील निवडणुकांदरम्यान केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

# संभ्रम निर्माण करू नका मी भाजपकडूनच इच्छुक; माजी आ.धोंडे यांचे स्पष्टीकरण

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसापासून आष्टीसह बीड जिल्ह्यात काही खोडसाळपणे माध्यमात मी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळाली असल्याच्या पोस्ट व्हायरल करत आहेत परंतु हा खोडसाळ पणा आहे मी भारतीय जनता पार्टीचा माजी आमदार आहे भाजपकडूनच मी इच्छुक आहे दुसरीकडे कुठे जायचं असेल तर सर्व कार्यकर्त्यांना विचारून हा निर्णय घेतल जाईल अशी माहिती माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आज मराठीशी बोलताना दिली आहे



आष्टी विधानसभा मतदारसंघात विविध चर्चांच्या वावड्या मोठ्या प्रमाणात उठत आहेत आमका या पक्षातून तमक्या तिकडुन अशा सोशल मीडियावर मोकार छाप पोस्ट शेअर केल्या जात आहेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून मला तिकीट मिळणार आहे मिळाले आहे अशा पोस्ट चुकीच्या पद्धतीने शेअर केल्या जात आहेत मी भारतीय जनता पार्टी कडून इच्छुक आहे त्यामुळे अशा संभ्रम निर्माण करणाऱ्या बातम्यावर कुणीही विश्वास ठेवू नये अशी माहिती माजी आमदार भीमराव धोंडे यांनी माध्यमांशी बोलताना शनिवारी दुपारी दिली आहे .

## झेड प्लस सुरक्षेसाठी पवारांना केंद्राचा आग्रह



मुंबई । प्रतिनिधी

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर केंद्रीय सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकारने सुरक्षेचा आढावा घेतला आहे. त्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय आढावा

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | २,४२१ | २,५४० | २,४८७ |
| ज्वारी/हायब्रिड :४२.५० क्विंटल | १,६२५ | २,७११ | २,१८१ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :२०.०० क्विंटल | ५,२०० | ७,६०० | ६,७३४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५०१ | २,५०० |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६९० | ७,१०० | ६,९६४ |
| सोयाबीन: ७५३.०० क्विंटल | ३,००० | ४,४०० | ४,०२९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

# शासन निर्णयांची झाडाझडती; तासाभरात १०० निर्णय रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाल्यानंतरही जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयांची चौकशी केली जाणार असल्याचे आधीच राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाच्या या पवित्र्यानंतर प्रशासनाने एका तासात १०० शासन निर्णय रद्द केले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आता या प्रकरणी आयोगाने प्रशासनाकडे सविस्तर अहवालाची मागणी केली आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय आयोगाने निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहीर केला आहे. या घोषणेनंतर




राज्यात आचारसंहिता लागू झाली. राज्य सरकारने बुधवारी दुपारी ३.३० नंतर अनेक शासन निर्णयांची घोषणा केल्याने याबाबत निवडणूक आयोगाने चौकशीचे संकेत दिले. त्यानंतर मंत्रालयातील हालचालींनाही वेग आला असून आयोगाने गुरुवारी तातडीने प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक बोलवून याबाबत विचारणा केल्याचे समजते. या बैठकीत शासन निर्णयांपैकी काही शासन निर्णय हे १४ ऑक्टोबरचे असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. मात्र, तत्पूर्वीच निवडणूक आयोगाने राज्य सरकारला आचारसंहितेच्या नियमांचे पालन करण्याची सूचना दिली होती, तसेच हे शासन निर्णय संकेतस्थळावर आचारसंहितेनंतर टाकण्यात आल्याने त्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे. दरम्यान, दुपारी ३.३० नंतर काही शासन निर्णय जाहीर करण्यात आल्याचे समोर आले. त्यामुळे हे शासन निर्णय पुढील तासाभरातच रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. या कालावधीत प्रशासनाकडून १०० हून अधिक शासन निर्णय रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. या शासन निर्णयांमध्ये महामंडळांच्या संदर्भातील नियुक्त्यांच्याही शासन निर्णयांचा समावेश असल्याचे कळते. त्यामुळे अनेक महामंडळांच्या नियुक्त्या आता पुन्हा एकदा रखडणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. या शासन निर्णयांमध्ये महामंडळांबाबत २७ शासन निर्णयांचाही समावेश असल्याने आता याबाबत राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे.

### शासन निर्णयांबाबत संभ्रम

राज्य सरकारतर्फे एखादा शासन निर्णय रद्द करतानाच त्यासंदर्भातील शुद्धिपत्रक किंवा परिपत्रक जाहीर करण्याची प्रथा आहे. मात्र, गेल्या दोन दिवसांत जे शासन निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करून काही वेळातच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंदर्भातील सविस्तर शुद्धिपत्रक अथवा इतर परिपत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे शासन निर्णय रद्द झाले की नाही, याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला असल्याची माहिती पुढे आली आहे.

### दोन दिवसांत अहवाल?

आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रशासनाकडून प्रसृत करण्यात आलेले अनेक शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत. यासंदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्याची सूचना आयोगाने केली असून, साधारण दोन दिवसांत हा अहवाल आयोगाकडे सादर केला जाऊ शकतो, अशी माहिती सुत्रांनी दिली.

## अग्रलेख

# मान्सूनची एक्झिट

मागील चार महिन्यांच्या दमदार पर्जन्यवृष्टीनंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अखेर देशातून निरोप घेतला आहे. त्यामुळे पावसाळा संपला, असे म्हणायला आता हरकत नसावी. मोसमी पाऊस हे भारतासारख्या देशाला लाभलेले वरदान आहे. येथील ६० ते ६५ टक्के लोकसंख्या ही आजही शेती वा शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. स्वाभाविकच कृषी अर्थव्यवस्था हा भारतीय अर्थकारणाचा महत्त्वाचा गाभा आहे.

साधारणपणे जून ते सप्टेंबर हा पावसाचा हंगाम मानला जातो. अंदमान वा केरळमध्ये मान्सूनचा प्रवेश झाल्यानंतर खऱ्या अर्थाने पावसाला सुरूवात होत असल्याचे मानले जाते. यंदाच्या पावसाचा एकूणच प्रवास पाहिला, तर तो नक्कीच समाधानकारक म्हणता येईल. या हंगामात पावसाने देश तसेच राज्याला भरभरून दान दिल्याचे पहायला मिळते. १ जून ते ३० सप्टेंबरच्या कालावधीत महाराष्ट्रात सरासरीच्या २६ टक्के, गोव्यात ४६ टक्के, तर संपूर्ण देशभरात सरासरीच्या १०८ टक्के अधिकचा पाऊस नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेती, उद्योगांची चिंता मिटल्याचे दिसून येते. यंदा पूर्वोत्तर भाग वगळता देशभर चांगला पाऊस झाला. गेल्या वर्षी एल निनोमुळे पावसाची सरासरी गाठताना दमछाक झाली होती. या वर्षी मात्र एल निनोचा तितकासा प्रभाव जाणवला नाही. परिणामी मोसमी पाऊसही चांगला झाला. यामध्ये राजस्थान ५६, गुजरात ४८, तेलंगण २९, लक्षद्वीप २७, महाराष्ट्रात २६, गोवा ४६, कर्नाटक ११, तर आंध्र प्रदेश, दिल्ली, सिक्कीमच्या भागात अतिरिक्त पाऊस नोंदविण्यात आला आहे. याशिवाय उत्तरेतील राज्यांमध्येही कमी अधिक प्रमाणात चांगला पाऊस झाल्याचे आकडेवारी सांगते. हे चित्र सुखावह आहे.

महाराष्ट्राचा विचार केला, तर दोन ते तीन जिल्हे वगळले, तर सर्वदूर आनंदसरींची बरसात झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदा महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकसह सर्वत्र चांगले पीक येईल, सुगीचे दिवस येतील, अशी आशा निश्चितपणे करता येईल. पूर्व मोसमी पावसापासून ते परतीच्या पावसापर्यंत पावसाचे वेगवेगळे मूड्स दरवर्षी अनुभवायला मिळत असतात. कधी हा पाऊस झोडपून काढतो, कधी रिमझिमतो, रिपरिपतो, तर कधी कधी दिवसरात्र एका लयीत बरसत राहतो. परतीच्या पावसाचा धसमुसळेपणा हा तर अभ्यासाचा विषय म्हणता येईल. दिवा विझताना जसा फडफडतो, तशी या पावसाची तऱ्हा असते. तो लांबला की मात्र पंचाईत होते. मागच्या काही वर्षांत परतीचा पाऊस लांबल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यात हंगाम संपल्यानंतरही पडत राहणारा अवकाळी पाऊस हा शेतकऱ्यांसह सगळ्यांसाठीच डोकेदुखी ठरतो. लक्ष्मीपूजन, दिवाळी असो की गुढीपाडवा. कुठल्या शुभमुहूर्तावर हा पडेल त्याला नेम नसतो. आता दिवाळसण तोंडावर आहे. तेव्हा हे पावसाचे मळभ नसावे, हीच सर्वांची अपेक्षा राहील. दुसरीकडे ऑक्टोबर हीटलाही सुरूवात झाल्याचे दिसून येते. मागच्या काही दिवसांमध्ये सर्वच शहरांमधील उकाडा प्रचंड वाढला आहे. उन्हाच्या झळांनी अक्षरश: उन्हाळाच सुरू असल्याचा फिल जाणवत आहे. देशाच्या बहुतांश भागांत पुढच्या काही दिवसांत कमाल तसेच किमान तापमान अधिक राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. महाराष्ट्र तसेच देशाच्या काही भागातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून, हे सत्र कायम राहणार आहे. मागच्या काही वर्षांमध्ये ऋतूबदलाला आपल्याला सामोरे जावे लागत आहे. हे बघता ऑक्टोबर हीट लांबणार का, याकडेही पहावे लागेल. यंदा पाऊस चांगला झाला. हे बघता थंडीचा कडाका व उन्हाचा तडाखा कसा राहणार, याबाबत देशवासियांमध्ये उत्सुकता आहे. नैऋत्य मोसमी पावसासोबत ईशान्य मोसमी पाऊसही महत्त्वाचा मानला जातो. विशेषत: दक्षिणेतील राज्यांमध्ये हा पाऊस आपले उपद्रवमूल्य दाखवून देतो. ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान दक्षिणेकडील राज्यात बरसणारा हा ईशान्य मोसमी पाऊस यंदा सरासरीच्या ११२ टक्के इतका राहणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे पुढच्या काही दिवसांत दक्षिणेतील राज्यांना ॲलर्ट रहावे लागेल. चेन्नईचा पूर, त्याने झालेली हानी हा इतिहास फार जुना नाही. वाढत्या नागरिकरणामुळे शे व्वाशे मिमी पाऊसही मोठ्या जलप्रलयास आमंत्रण देणारा ठरत आहे. हे लक्षात घेऊन दक्षिणेतील राज्यांना व तेथील नेतृत्वाला सर्व शक्याशक्यता लक्षात घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते. खरे तर पाऊस हे समृद्धीचे, भरभराटीचे प्रतीक मानले जाते. गेल्या काही वर्षांचा पावसाचा ट्रेंड पाहिला, तर त्यात चढ उतार नक्कीच दिसतील. पण, अवर्षणग्रस्त स्थिती उद्भवेल, इतपत माया पावसाने पातळ केलेली नाही, हे शुभचिन्ह म्हणावे लागेल. असे असले, तरी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हे आपल्या सर्वांचे कर्तव्य ठरते. यंदा बहुतांश जलाशय काठोकाठ भरले आहेत. अनेक भागामध्ये मुबलक पाणी असल्याचे पहायला मिळते. परंतु, या पाण्याचा अपव्यय करता कामा नये. पाण्याची गळती असेल, तर ती तातडीने कशा पद्धतीने रोखता येईल, याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. आजही दुर्गम भागातील अनेक नागरिकांना पावसाळ्यानंतर भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. अशा अभावग्रस्त जनतेला पाणी कसे पोहोचविता येईल, त्यांचे जगणे सुसह्या कसे करता येईल, यासाठीही प्रयत्न करायला हवेत. भूजलाचा प्रचंड उपसा हाही अलीकडे एक प्रश्न बनला आहे. यंदाच्या पावसाने भूजल पातळी बऱ्यापैकी वाढेलही. पण, उन्हाळ्यात पुन्हा पाणी आटणार, हे वेगळे सांगायला नको. हे बघता भविष्यात पाणी जिरवणे व मुरवणे, यावर अधिकचे काम करावे लागणार आहे. दोन, पाच वर्षांतील एखादे वर्ष यंदासारखे पाणीदार असते. पण, बरेचशे पाणी वाहून जाते. त्याऐवजी हे पाणी जिरवले, साठवले, तर ते उपयुक्त ठरू शकते. कॉंक्रिटीकरणामुळे शहरांमध्ये पाणी मुरण्याच्या प्रक्रियेलाच खीळ बसत आहे. हे बघता या स्तरावर भविष्यात मुळापासून काम करावे लागेल.

# फुले मार्केट उभारणीचा प्रश्न जालन्यासाठी दुर्दैवी, लाजविणारा - हस्तीमल बंब

जालना( प्रतिनिधी)

व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्या प्रमुख पदाधिकार्यांची तातडीची बैठक जिल्हाध्यक्ष श्री हस्तीमलजी बंब यांच्या कार्यालयात दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आली. बैठकीचे उद्देश्य प्रास्ताविक करताना श्री बंब म्हणाले नुकतेच निवडणुका जाहीर झालेले आहे. अनेक वर्षापासून फुले मार्केट उभारणीचा प्रश्न प्रलंबित आहे. जवळपास १५ वर्षापुर्वी जालना शहराच्या मध्यभागी बाजार पेठेत असलेला महात्मा फुले मार्केट शासना तर्फे पाडण्यात आले होते. त्यावेळी आश्वासन देण्यात आले होते कि, गाळेधारकांना अत्याधुनिक सुविधायुक्त मार्केट उभारुन जूने किरायदारांना दुकाने देण्यात येईल तेथे अनेक वर्षापासून लहान-सहान मध्यमवर्गीय व्यापारी, व्यवसाय करून आपले उदरनिर्वाह करीत होते. नगर परिषद, जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी, मंत्री, राज्यमंत्री, गृहमंत्री, मुख्यमंत्री यांना अनेक वेळा निवेदन देऊन पाठपुरावा करून ही फुले मार्केटचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. मार्केट उभारण्यात आले नाही. हा व्यापार्यांचा रोजी-रोटीचा प्रश्न आहे. अनेक लहान-सहान व्यवसायिकांचे संसार रस्त्यावर आले आहे. त्यामुळे व्यापारी वर्गात संतापाची लाट पसरलेली आहे. त्या जागेवर घाणीचे सम्राज्य पसरलेले आहे व अतिक्रमण वाढत आहे. त्यामुळे अवैध धंद्यांना वाव मिळत आहे. हा विषय फक्त व्यापार्यां पुरता नसून जालना शहराच्या प्रतिष्ठितेचा प्रश्न आहे. फुले मार्केट उभारणीचा प्रश्न जालन्यासाठी दुर्दैवी, लाजविणारा, कळंक आहे. व्यापारी समाज शांतीप्रिय समाज आहे. अन्याय झाले तरी ही आंदोलन, उपोषण, रस्तारोको, सत्याग्रह करीत नाही. गणपती उत्सव असो, आंबेडकर जयंती, भंडारा, धार्मिक, सामाजिक कार्यात, राजकीय पक्षाला वर्गणी देण्यास उद्योजक, व्यापार्यांचा मोठा योगदान आहे. जालना जिल्हा कर भरण्यास सुध्दा आघाडीवर आहे. लवकरच व्यापार्यांची मोठी बैठक घेऊन फुले मार्केट उभारणीच्या प्रश्नांवर पुढची दिशा ठरविण्यात येईल. हा प्रश्न मार्गी न लागल्यास लोकशाही पध्दतीने आंदोलन, सर्व प्रकारचे कर न देणे, अन्यथा वेळ आल्यास येत्या निवडणुकाचा बहिष्कारचे नाईलाजाने विचार करावे लागेल असे बंब म्हणाले. उपाध्यक्ष सुखदेव बजाज विचार मांडताना जिल्ह्यात लहान मोठे उद्योग व्यवसाय करणार्यांची जवळपास २० हजार संख्या आहे. प्रत्येकांचा व्यवहार असल्यामुळे लाखो लोक आमच्या सोबत आहे. गल्ली ते दिल्ली पर्यंत दिशा बदलण्याची क्षमता व्यापारी वर्गात आहे. शासनानी फुले मार्केट संदर्भात व्यापार्यांच्या सहनशिलतेचे अंत पाहु नये असे बजाज म्हणाले. वरिष्ठ उपाध्यक्ष मर्चन्ट बँकेचे माजी अध्यक्ष श्री अंकुश राऊत आपले विचार मांडताना जालना जिल्ह्याची ओळख व्यापारी वर्गामुळेच आहे. प्रत्येकांचा सुखा दुखात व्यापार्यांचा मोठा योगदान आहे. व्यापारी लोक प्रतिनिधी असताना जालना जिल्ह्याचे चांगला विकास झालेला आहे. तरी लोकप्रतिनिधीनी पक्षानी उमेद्वारांनी आपल्या निवडणुक जाहिरनाम्यात फुले मार्केट चा रखडलेला प्रश्न टाकुन लवकरात लवकर प्राधान्याने मार्गी लावण्याचे लेखी हमी द्यावा असे राऊत म्हणाले. कोषाध्यक्ष अतुल लड्ढा यांनी आपले विचार मांडले. शेवटी आभार सचिव प्रविण मोहता यांनी केले व माहिती पत्रक देण्यात आले.




# पिंपळवंडी येथे कायदेविषयक महिला जनजागृती शिबिर संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे हनुमान मंदिर समोरील सभागृहात तालुका विधी सेवा समिती पाटोदा व पाटोदा वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक महिला जनजागृती शिबिर संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाटोदा न्यायालयाच्या न्यायाधीश सौ.निकम मॅडम ह्या होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून अंमळनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नि.भार्गव सपकाळ होते.

यावेळी न्यायाधीश निकम मॅडम यांनी जेष्ठ नागरिक यांचे हक्क व अधिकार यावर सविस्तर मार्गदर्शन करून, वयोवृद्ध आई-वडिलांना त्यांचे मूले व असणारी वारसाकडून कित्येक ठिकाणी छळवणूक व तिरस्काराची वागणूक देऊन त्यांना घराबाहेर काढले जाते,हा वृद्धांवर अन्याय होतो. आई-वडिलांना घराबाहेर काढणे हा गुन्हा आहे.या गुन्ह्यात आरोपीला कायद्याने कारावासाची तरतूद केलेली आहे.तसेच आई-वडिलांना मुलाकडून व वारसाकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे.अशा अनेक विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ए.पी.आय.सपकाळ यांनी सध्याच्या माहिती व तंत्र वैज्ञानिक युगात दैनंदिन जीवनात व्यवहारात कसे फसवणुकीचे प्रकार घडत आहेत,मोबाईल व इंटरनेट, ऑनलाईन मुळे आर्थिक तसेच वैवाहिक जीवनात मोठ्या प्रमाणात फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. त्यापासून सर्वांनी सावधानता कशी बाळगावी याची सविस्तर माहिती सांगून पोलीस विभाग सायबर गुन्ह्याचा छडा लावून आरोपी शोधतात.त्यासाठीही त्यांना खूप मेहनत घ्यावी लागते. फसवणुकीपासून सर्वांनी दक्ष रहावे असे त्यांनी यावेळी आव्हान केले. तसेच ॲड.तुषार जाधव यांनी बालविवाह रोखणे ही काळाची गरज असून मुलींना त्यांच्या इच्छेप्रमाणे खूप शिकवून उच्च पदाधिकारी बनवण्याची पालकांनी संधी द्यावी, असे मार्गदर्शन करून महीलावर होणारे अन्याय-अत्याचार ही चिंतेची बाब असून त्यांच्यावर अत्याचार करणारे जवळचे असतात.त्यामुळे अत्याचाराला बळ मिळते त्यासाठी चांगल्या समाज जागृतीची गरज आहे. आपलेच अज्ञान आपल्याला नडले जाते.त्यासाठी अंधश्रद्धा संपली पाहिजे.या कार्यक्रमाला सरपंचपती निलेश मोरे,तलाठी श्रीमती दिपाली लांडगे,ग्रामविकास अधिकारी श्रीमती भोपळे,तसेच ॲड.एल.आर. नागरगोजे अध्यक्ष वकील संघ.ॲड. ए.एम.सय्यद सचिव वकील संघ,ॲड.अजित थोरवे,ॲड.विलास पवार,ॲड.विशाल मस्के,ॲड.तुषार जाधव,ॲड.ओंकार पवार तसेच आदीसह परिसरातील महीला ग्रामस्थ मोठया संखेने उपस्थित होते.



# रस्त्या मधोमध वाहनांमुळे व अतिक्रमणामुळे शहरात वाहतुकीची मोठी समस्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील विविध चौकात रस्त्यालगत मोठी व दुचाकी वाहने चाललेली व उभी करून ठेवली जात असल्याने वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. त्यामुळे काही प्रमाणात अपघात देखील झाल्याचे ऐकीवात आहे. पोलीस प्रशासनाने आणि वाहतुक पोलीसांनी ही कोंडी दुर करण्यासाठी तातडीची उपाययोजना करावी अशी नागरिकांतुन होत आहे.

रस्त्याच्या बाजुला वाहने उभे करून ठेवली जातात आणि चालविणारे व्यवस्थित चालवित नाहीत त्यानी जर ती कोंडी कोंडी दुर करण्यासाठी मदत होईल शिवाय इतर व्यावसायीक आपले दुकानातील सामान रस्त्यावर मांडतात त्या अतिक्रमणामुळे गर्दी होते त्यामुळे वाहनांना नागरिकांना व दुचाकी धारकांना अडचण होते. योगेश्वरीदेवी मंदीर , पाटिल चौक,या मुख्य चौकात मार्ग काढणे कठीण होते. आणि रस्त्यावर विद्यार्थी महिला, आणि पुरूष, ज्येष्ठ नागरिक यांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. काही मार्गावर एकेरी वाहतुकीचीही गरज आहे.

शहराच्या साठे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नगर परिषद परिसर, स्वा. सावरकर चौक, योगेश्वरी प्राथमिक वाहनांची रेलचेल असते त्यामुळे तिथे सतत वाहतुक पोलिस आवश्यक आहे. परंतु त्या ठिकाणी नसल्याकारणामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे नगर परिषद, पोलीस प्रशासन या विभागाने लक्ष घालुन ही समस्या सोडविली पाहिजे. त्यातूनच काही भागात रस्त्यावरच रिक्षा उभ्या असतातआणि मुख्य गोष्ट म्हणजे सर्वच चौकात भाजी विक्रेते हातगाडे उभे असतात त्यांना उभे राहण्यासाठी जागा दिल्यास वाहतुक काही प्रमाणात सुरळीत होईल ती उपाय योजना करावी अशी ही नागरिकांची मागणी आहे.



## पान १ वरून...

### अनेक मतदारसंघात दहा

आघाडीने केला आहे. अजूनही इतर मतदारसंघाची माहिती घेत असल्याचे त्यांनी हटले आहे. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, आम्ही या मतदारयादीबद्दल राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. निवडणूक पारदर्शक पद्धतीने व्हावी, अशी मागणी केल्याचे ते म्हणाले. मात्र, राज्यातील निवडणूक पारदर्शकपणे होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोग हा मोदींच्या पायाशी बसला आहे का? अशी विचारणा सुद्धा नाना पटोले यांनी केली. ते पुढे म्हणाले की लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम आम्ही कदापि होऊ देणार नाही. हे पाप निवडणूक आयोगाने थांबवलं पाहिजे.

### परळी नगर पालिकेने सर्वसामान्य

सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी

शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील कराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील काराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत.

याबाबत राजेभाऊ श्रीराम फड यांनी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अँडव्होकेट श्री यावलकर व अँडव्होकेट श्री नागरगोजे यांच्या मार्फत याचिका दाखल केली. सदरील याचिकेमध्ये मा न्यायालयास विनंती केली कि सदरील कर आकारणी चुकीची आहे व ती रद्द ठरवावी व दुसरी विनंती अशी केली कि नगरपरिषद परळी वैजनाथ यांनी आजपर्यंत आजपर्यंत नाव नोंदणी (पीटीआर) साठी जी रक्कम परळी शहरातील नागरिकांकडून अनाधिकृत पणे वसूल केली आहे ती रक्कम त्यांना नगरपरिषद कडून परत मिळावी अशी विंनती करून याचिका दाखल केली असता सदरील याचिकेमध्ये दिनांक १६/१०/२०२४ रोजी सुनावणी झाली. सदरील याचिकेवर मा. न्यायामूर्ती अवचाट साहेब व धोटे साहेब यांनी नगर परिषद परळी वैजनाथ यांना नोटीस काढून पुढील सुनावणी दिनांक २७/११/२०२४ रोजी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे ठेवण्यात आलेली आहे.

### उदगिरात आज राज्यस्तरीय

दळवी यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलन होणार आहे. यात साहित्य पत्रकार पूजा काळे, भीमराव गवळी, माधव डोळे, सुरेश ढमके (मुंबई), संजय ऐलवाड (पुणे), रागिणी पवार (अंबेजोगाई), रामदास केदार, भरतकुमार गायकवाड, शंकर बोईंवाड (उदगीर) हे सहभागी होणार आहेत. सायंकाळी पुरस्कार वितरण व समारोप सत्र होणार असून, अध्यक्षपदी संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रेस फोटोग्राफर प्रतिनिधी अभिजित गुर्जर उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कार वितरण प्रसंगी एस. एम. देशमुख, संमेलन अध्यक्ष रवींद्र चिंचोलकर, नामदार संजय बनसोडे, माजी आमदार सुधाकर भालेराव, जिल्हाधिकरी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमया मुंडे, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, विश्वजित गायकवाड, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सागर सुरेश महाजन, सुरेश नाईकवाडे, बाळासाहेब पाटोदे, मन्सूरभाई शेख, सचिन मिटकरी, विजय जोशी, अभिषेक शिंदे, राजकुमार पुजारी, युवराज धोतरे आदी उपस्थित राहणार आहेत. या संमेलनासाठी अधिकाधिक रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. बिभीषन मद्देवाड, सचिन शिवशेट्टे, श्रीनिवास सोनी, सुनिल हावा पाटील, अर्जुन जाधव, सिध्दार्थ सुर्यवंशी, नागनाथ गुट्टे यांनी केले आहे.

### झेड प्लस सुरक्षेसाठी

बैठकीत घेण्यात आला आहे. पवार यांना लवकरच झेड प्लस सुरक्षा घेण्यासाठी आग्रह करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. याआधीही पवार यांना झेड प्लस दर्जाची सुरक्षा व्यवस्था घेण्याची विनंती केंद्र सरकारच्या सुरक्षा यंत्रणांनी केली होती. त्यांच्या सुरक्षेसाठी ५५ सशस्त्र सीआरपीएफ जवानांची तुकडी तैनात करण्याचा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाने घेतला होता. मात्र ही सुरक्षा घेण्यास शरद पवार यांनी नकार दिला होता.

## पान ६ वरून...

### गोरगरिबांना कुटुंबाप्रमाणे

पोलीस स्टेशनचे, घरातील लेकीबाळीचे काम असो की, शेताच्या बांधावरून झालेल्या भांडणाचा वाद असो या प्रत्येक ठिकाणी बदामराव पंडित हे स्वतः उपस्थित राहून त्यातून योग्य मार्ग काढण्याचे काम आजपर्यंत करत आले आहेत. सर्व समाजाला सोबत घेऊन सतत सकारात्मक काम करत असल्याने आज गेवराई विधानसभा मतदारसंघात बदामराव पंडित यांच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांची संख्या दुप्पट वाढली आहे. केलेल्या कामाबद्दल या विधानसभा निवडणुकीत त्यांना मतदान करून आपले आशीर्वाद द्या आणि विधानसभेत गेवराई मतदार संघाचा आमदार म्हणून काम करण्याची त्यांना संधी द्या असे आवाहन युधाजित पंडित यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले आहे.

यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना किसान सेल तालुका अध्यक्ष सतीश सपकाळ, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाध्यक्ष तय्यब पठाण, सरपंच भैय्यासाहेब नाईकवाडे, बदाम पौळ यांची उपस्थिती होती. प्रत्येक गावात झालेल्या गाठीभेटीच्या दौऱ्यात ग्रामस्थांसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माधव निर्मळ यांना आमदार

शाहू कोळेकर, बंडू निर्डे, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक हरिभाऊ गवळी, नारायणराव डोंगरे, बबनराव डोंगरे, किसनराव माने नारायणराव माने, मा. ग्रामपंचायत सदस्य नवनाथ रुपनर, आत्माराम आप्पा मंत्री, विठ्ठलराव गवळी, रोहिदास मंत्री, बबन रुपनर ,भगवान गवळी, दासू डोंगरे, ल्याकद भाई शेख, जनक दादा तंबूड, सुधाकर तंबुड, लक्ष्मणराव सपकाळ, सिद्धेश्वर पांचाळ, नुरभाई शेख, पप्पू चोपडे, बाळासाहेब चोपडे, नंदकुमार सोळंके , गणेश वैजनाथ पांचाळ, विठ्ठलराव राऊत, अतुल गवळी, मच्छिंद्र उजगरे, दिलीपराव चोपडे, पप्पू चोपडे, विलासराव गवळी अण्णासाहेब गवळी संदिपान राऊत, बाबासाहेब शेंडगे, मनोज डोंगरे, मसुदादा डोंगरे, विशाल गायकवाड, राम रुपनर, निलेश गायके, शंकरराव चौरे, विनोद चिंतामणी, हनुमंत देशमाने, श्रीराम उंडाळकर, विष्णू गवळी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### सोयाबीन,कापसाला आधारभूत

मोदी सरकारला केली आहे. मोदी सरकारने यावर्षीच्या सोयाबीनला प्रतिक्विंटल ४८९२/- रुपये आणि कापसाला ७१२१/- रुपये आधार भूत किंमत जाहीर केली आहे.सोयाबीनला उत्पादन खर्चापेक्षा सुमारे २०००/- रुपये तर कापसाला २५००/- रुपये मोदी सरकारने कमी दिल्याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आक्षेप घेतलेला नाही. बाजार समिती कायद्यातील कलम ३२-ड नुसार शेतीमालाला आधारभूत किंमत मिळवून देण्याची जबाबदारी बाजार समितीच्या संचालक मंडळाची आहे.परळी वैजनाथ आणि अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या ताब्यात आहेत. दोन्ही बाजार समितीत सोयाबीनची विक्रमी आवक सुरू आहे.मात्र सोयाबीनला आधारभूत किंमत मिळवून देण्यातही धनंजय मुंडे सपशेल अपयशी ठरले आहेत.सोयाबीनला कायद्याने ४८९२/-रुपये प्रतिक्विंटल भाव देणे बंधनकारक आहे. परळी, अंबाजोगाईच्या बाजार समितीत प्रतिक्विंटल १००० ते १२००/- रुपयाला शेतकरी लुबाडला जात आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांनी याचा हिशेब करावा. असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

### मॅटच्या आदेशावरून निवासी

सुत्रे पुन्हा श्री. महाडीक यांच्याकडे देण्यात आली

आहेत. काहीच कारण नसताना बदली कशामुळे झाली होती कशामुळे करण्यात आली होती याचं उत्तर महाराष्ट्र शासनाकडे

नसल्याचे यावरून दिसून येत आहे.

यापूर्वी श्री महाडिक यांनी सन २०११ ते २०१७ या कालावधीत सिंधुदूर्ग येथे परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. तर सन २०१७ ते २०२० या कालावधीत त्यांनी परळी येथे उपविभागीय अधिकारी तर सन २०२० ते २०२४ या कालावधीत लातूर येथे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन), तसेच हिंगोली येथे जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ मध्ये उपजिल्हाधिकारी (रोहयो) म्हणुन काम केले आहे. पदभार स्वीकारल्या नंतर श्री. महाडिक म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना पोचविण्याचा प्रयत्न करणार आहे

### बाजार समितीचे सचिव

आहे तालुक्यातील किरकोळ विक्रेत्याकडून गोरगरीब शेतकऱ्यांची फसवणूक झाली नाही पाहीजी या मुळे केंद्र सरकारने व राज्य सरकारने हमीभाव ठरवलेला आहे हमीभाव शेतकऱ्यांच्या पदरात पडण्याकरिता शासनाने नाफेड केंद्र प्रत्येक तालुक्याला चालू करण्याचे ठरवलेले आहे आज परतुर तालुक्यामध्ये नाफेड केंद्र चालू झाल्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल जेणेकरून आपला माल कवडीमोल किमतीत विकल्या जाणार नाही यासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी नाफेड सेंटर सुरू केलेले आहे ह्या नाफेड केंद्रामार्फत सर्व शेतकऱ्यांनी आपला माल विकून आपली स्वतःची होणारे नुकसान थांबवावी सर्व शेतकऱ्यांचा माल शासनाने ठरवल्याप्रमाणे जे काही रेट असतील त्याप्रमाणे परतुर येथील नाफेड सेंटर वर खरेदी केल्या जाईल असे परतुर कृषी बाजार समितीचे सचिव लिपणे यांनी या वेळी सांगितले यावेळी कार्यक्रमास उपस्थित परतुर कृषी बाजार समितीचे सचिव लिपने ,सेंटर चालक संजय भापकर ,डोंगरे, लाळे, लबासे, सोळके, कादे, शेतकरी रामा भापकर, विष्णु मानने, राजु मुजमुले, आसाराम शेळके चेरमन,कैलास मातने, बंडू पवार, रवि कदम उपस्थित होते

### बंजारा समाजाचे नेते

त्यांनी अनेक निवेदने,आंदोलने केली आहेत आणि सरकारने त्यांच्या आंदोलनाची,निवेदनाची दाखल घेत निर्णय घेतला आहे लवकरच छोट्या छोट्या तंड्याना ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त होणार आहे तसे आदेश निघालेले आहेत.

अनेक आंदोलनात त्यांच्यासोबत अठरापगड जातीचे समाज बांधव उपस्थित असतात जनमानसात स्वतंत्र ओळख निर्माण त्यांनी त्यांच्या कार्याच्या माध्यमांतून निर्माण केलेली आहे.आज रोजी शासनाच्या माध्यमातून संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना राबवल्या जात आहे या योजनेची मागणी श्री रमेश पवार यांनी मागील दहा वर्षापासून लावून धरलेली होती. बीड जिल्हा बंजारा समाजाचे नेते तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड यांचे निकटवर्तीय समजले जाणारे रमेश पवार माजलगाव विधानसभा निवडणुक मोठ्या ताकदीने लढणार असल्याने होऊ घातलेल्या निवडणुकीत रंगत येणार आहे

cmyk

## पोलीस/ सैन्य पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम

बीड : आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी पोलिस व सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षणाकरिता ऑनलाइन अर्ज करायचे आहेत. ही त्यांना मुदतवाढ देण्यात आली. शैक्षणिक व शारीरिक पात्रता - १२ वी उत्तीर्ण वय - १८ ते ३३ वर्ष उंची - १६० विद्यार्थ्यांना पोलीस सैन्य भरती मोफत पूर्व प्रशिक्षण व प्रशिक्षणा दरम्यान शासनाच्या वतीने विद्या वेतन १००००/- रुपये प्रति महिना आणि अनुषंगिक लाभ १२०००/- रुपये प्रति विद्यार्थी मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना मैदानी प्रशिक्षणासाठी ट्रॅक सूट - २ शूज - २ बेल्ट - १ नोटबुक - २ पेन - १२ हे सर्व मोफत दिले जाईल. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी २० ऑक्टोबर २०२४ पर्यंत मुदअभ्यासक्रमाची सर्व पुस्तके त देण्यात आली आहे.अर्ज करण्यासाठी महत्त्वाची कागदपत्रे - १)आधार कार्ड २)दहावी व बारावी पास मार्क मेमो / प्रमाणपत्र ३)जात प्रमाणपत्र ४) डोमेसाईल प्रमाणपत्र /अप्लाय केलेली पावती ५) उत्पन्नाचा दाखला/अप्लाय केलेली पावती, तरी विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी नमूद दिनांकाच्या आत आपले अर्ज ऑनलाईन सादर करावे.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि.२० ऑक्टोबर २०२४



# शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी मते द्या-भाई ॲड.गोले

माजलगाव। प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात शेतकरी प्रचंड व्यतीत झाला असून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या हमीभावासह दैनंदिन महागाई, बि-बियाण्यांच्या वाढत्या किमती, खते औषधे यांच्यात येणारी वाढती भेसळ, आणि साखर कारखानदाराकडून होणारी शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी म्हणजेच शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या खटाऱ्याला मते देण्याचे आवाहन भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले.

कृषीप्रधान देशात शेतकरी दुर्लक्षित असून गेल्या ७० वर्षात शेतकऱ्याच्या शेतमालाला कीफायातशिर हमीभाव देणारा कायदा राज्यात आणि केंद्रात शासन करू शकलेले नाही याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतमालाला लागणारे बी - बियाणे, खते, औषधे, वीज व इतर उपयुक्त साधने यांच्या किमती दिवसेंदिवस भरमसाठ वाढत असताना गेल्या साठ वर्षात कॉंग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेनेसह सर्वच प्रस्थापित पक्ष आणि प्रस्थापित राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना लुटण्याचे पाप केले असून या प्रस्थापित राजकीय पक्षांना आणि प्रस्थापित राजकीय पुढार्यांना धडा शिकवण्याची वेळ आलेली असून शेतकऱ्यांसाठी, कामगारासाठी,कष्टकऱ्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून सातत्याने आक्रमकपणे आणि प्रामाणिकपणे लढणारा शेतकरी कामगार पक्षाचा



लालबावटा आजही त्याच उमेदीने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढतो आहे, शेतकरी कामगार पक्षांचा आवाज बुलंद करण्यासाठी व भाई एन डी पाटील, भाई गणपतराव देशमुख,क्रांतीसिंह नाना पाटील,या महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या चळवळी जिवंत ठेवण्यासाठी तसेच माजलगाव मतदारसंघातल्या प्रस्थापित राजकीय पुढार्यांची गुंडागर्दी, प्रशासनाकडून शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवण्यासाठी शेतकऱ्यांच्या व्यथा विधानसभेत मांडण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा एक मताने निवडून द्या असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव विधानसभेचे उमेदवार भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी सुरमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथे कॉर्नर सभेत बोलताना केले, यावेळी व्यासपीठावर भाई मुंजा पांचाळ,भाई भास्कर कांबळे, भाई श्रीराम शेवाळे, राजेभाऊ घोडके, संभाजी चव्हाण यांची उपस्थिती होती तर सुरुमगाव, गुंजथडी, पिंपरी खुर्द, खतगव्हाण येथील गावकरी प्रचंड संख्येने उपस्थित होते, भाई ऍड नारायण गोले पाटील यांना जनतेतून प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

शेतकऱ्याची शेतमालाला हमीभाव मिळवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवून, माजलगाव मतदार संघात गेल्या पाच वर्षात शेतकऱ्या सह नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यात अपयशी ठरणाऱ्या आणि जनतेशी,जनतेच्या मताशी गद्दारी करणाऱ्यांना माजलगाव विधानसभा निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे विधानसभेचे उमेदवार भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी सरवर पिंपळगाव, सोमठाणा,अडोळा येथे प्रचार दौऱ्यात बोलताना केले. गतवेळी विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील शेतकरी, कष्टकरी, अल्पसंख्यांक, दलित,मुस्लिम समाजाने पुरोगामी विचाराचे उमेदवार म्हणून ज्यांना मते दिली त्याच लोकांनी जनतेच्या मताशी गद्दारी करत पहाटे शपथविधीला उपस्थिती दर्शवली तसेच अजित पवार यांच्यासह भाजपसोबत घरोबा करून पुरोगामी विचाराशी आणि जनतेच्या मताशी गद्दारी केली याशिवाय पाच वर्षात तालुक्यात माजलगाव मतदार संघात शेतकऱ्यांसह, कामगारांच्या, तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उदासीनता दाखवत शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या भाजपला बळ दिले त्यामुळे जनतेशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा याशिवाय जाती-जातीत भांडणे लावणाऱ्या आणि महागाई वाढवुन देशोधडीला लावणाऱ्या व शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव न देणाऱ्या, मराठा समाजा सह धनगर समाजाला आरक्षण नाकारणाऱ्या सरकारला घरचा रस्ता दाखवण्यासाठी शेतकऱ्याच्या कुटुंबातील कार्यकर्ता म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या खटारा चिन्हावर मत देऊन विजयी करण्याचे आवाहन भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, भाई भास्कर कांबळे, यांच्यासह सरवर पिंपळगाव, सोमठाणा, अडोळा शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

## सिरसगाव येथे विहिरीत जीसीपी पडून मजुराचा मृत्यू



परतुर। प्रतिनिधी

विहिरीच्या बाजूचे मटेरियल बाजूला करण्याचे काम करीत असताना जेसीबी . विहिरीत असलेले पाण्यात पडल्याने बुडून जेसीबी चालक मजुराचा मृत्यू झाला . ही घटना परतूर तालुक्यातील सिरसगाव येथे शुक्रवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली.

फक्रूर खान (२०, राजस्थान) असे मृत मजुराचे नाव आहे. शेतकरी सुभाष खरात यांची सिरसगाव-परतूर रोडवर शेती आहे. या शेतीत रस्त्याच्या लगत विहीर खोदण्यात आली आहे. या विहिरीच्या लगतचे मटेरियल जेसीबीच्या साहाय्याने बाजूला करण्याचे काम सुरु होते. जेसीबीचा चालक फक्रूर खान जेसीबीच्या केबिनमध्ये होता. या वेळी अचानक जेसीबी पाण्याने काठोकाठ भरलेल्या विहिरीत गेली. या घटनेनंतर मोठ्या संख्येने गावकरी विहिरीजवळ जमा झाले होते. विहीर पाण्याने भरलेली असल्याने काहीच करता आले नाही. याबाबत स्थानिक प्रशासनाला कळवून देखील निवडणूक कामात गुंग असलेल्या प्रशासनातील एकाही अधिकाऱ्याने पाच-सहा तासानंतरही भेट दिली नाही. शहरापासून सहा किमी अंतरावर ही विहीर असून देखील रात्री दहा वाजेपर्यंत कोणतीही प्रशासकीय मदत घटनास्थळावर न पोहोचल्याने गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

## कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचा ट्रेलर बाईसाहेबांच्या हस्ते लॉंच

### २५ ऑक्टोबर रोजी मराठीसह हिंदी भाषेत चित्रपट जगभर प्रदर्शित होणार

बीड । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभा मतदारसंघात तब्बल ११ वेळा आमदार राहिलेले तसेच दोन वेळा राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी राहिलेले दिवंगत गणपतराव देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे ट्रेलर आबासाहेबांच्या पत्नी रतनबाई देशमुख उर्फ बाईसाहेब यांच्या हस्ते लॉन्च करण्यात आले. यावेळी त्यांनी चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला तसेच चित्रपट छान बनविल्याची प्रतिक्रिया दिली. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देणारे दमदार आमदार, राज्याचे कॅबिनेट मंत्री राहिलेल्या दिवंगत गणपतराव देशमुख म्हणजेच सर्वांचे आबासाहेब यांच्या जीवनकार्याचा वेध ''कर्मयोगी आबासाहेब'' या चित्रपटातून घेतला गेला आहे.

दिवंगत गणपतराव देशमुख यांच्या पत्नी रतनबाई देशमुख (बाईसाहेब) यांच्या हस्ते चित्रपटाचा ट्रेलर सांगोला येथे लॉंच करण्यात आला. याप्रसंगी उल्हास धायगुडे, बाळासाहेब झपके संपूर्ण सांगोलकर मंडळी आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. २५ ऑक्टोबर रोजी मराठीसह हिंदी भाषेतही हा चित्रपट जगभरात प्रदर्शित होत आहे. मायका माऊली फिल्म प्रॉडक्शन आणि मुंबई क्रिएशन एंटरटेन्मेंटच्या मारुती तुळशीराम बनकर, बाळासाहेब महादेव एरंडे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अल्ताफ दादासाहेब शेख यांनी चित्रपटाचे लेखन, गीतलेखन आणि दिग्दर्शन केले आहे. अवधूत गुप्ते यांनी संगीत, कुमार डोंगरे यांनी छायांकन आणि संकलनाची जबाबदारी निभावली आहे. कुणाल गांजावाला, मनीष राजगिरे यांनी गाणी गायली आहेत. चित्रपटात अनिकेत विश्वासराव, हार्दिक जोशी, देविका दफ्तरदार, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, सुरेश विश्वकर्मा, अरबाज शेख, तानाजी गलगुंडे, घनश्याम दरोडे (छोटा पुढारी), अहेमद देशमुख, वृंदा बाळ, निकिता सुखदेव, अली शेख, अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या प्रमुख भूमिका आहेत. कार्यकारी निर्माता अमजद खान शेख असून प्रोडक्शन कंट्रोल सय्यद दादासो शेख यांनी काम पाहिले आहे.



## दिवाळी आली,बस स्थानकामध्ये गर्दी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिपावली सण आता सुरू होत आहे परगावी जाण्यासाठी अंबाजोगाई बसस्थानकामध्ये गर्दी दिसून येत असून नौकरीच्या गावी जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे सध्या अंबाजोगाई बसस्थानक गजबजले आहे येथील बसस्थानकाकडून सोलापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी,हिंगोली या मार्गावर ज्यादा बसेस सोडण्यात आल्याची माहिता आहे

सध्या सर्वत्र दिवाळीला जाण्याचे दिवस आहेत एक आठवड्यात दिवाळी सुरू होईल दिवाळी सणानिमित्त घरोघरी नवचैतन्याचे वातावरण होणार दिवाळी साजरी करण्यासाठी आता नोकरदारांना गावाकडे जाण्याची वेळ आली आहे तसेच उरलेल्या सुट्ट्याचे अनेकांनी नियोजन केले असून धार्मिक स्थळ, पर्यटन स्थळ या ठिकाणी देखील जाण्यासाठी सामान्य जनांची धावपळ आहे राज्य परिवहन महामंडळाने याचीच खबरदारी घेत अनेक ठिकाणी बससेवा सुरू केली आहे असे प्रवाशांनी सांगितले दिवाळीच्या काळात देखील राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मधून प्रवाशांची संख्या लक्षात घेता अनेक जादा बसेस सोडण्यात आल्या आहेत नंतर पुन्हा शहराकडून गावाकडे व विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळावर जाण्यासाठी प्रवास करणाऱ्यांना ज्यादा बसेस सोडण्यात आले आहेत अंबाजोगाई बस स्थानकावर दिवाळी सण तोंडावर आला असताना प्रवाशांची मोठया प्रमाणात गर्दी दिसत आहे.

## काकू-नाना प्रतिष्ठानचा फिरता दवाखाना ग्रामस्थांच्या आरोग्यास लाभदायी




बीड । प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त (आण्णा) क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू-नाना प्रतिष्ठान, राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष, तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय यांच्या समन्वयाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर बीड तालुक्यातील चौसाळा सर्कल मधील वाढवणा येथे दिनांक १९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले. वाढवणा गावात आयोजित शिबिरात ग्रामस्थांमध्ये सर्दी, खोकला, ताप, सांधेदुखी, अंगदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण निदर्शनास आले.

शिबीराचे वैशिष्ट्य म्हणजे तज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून मोफत सामुदायिक आरोग्य तपासणी, विनामूल्य रक्त, लघवी, ईसीजीची तपासणी, गरज भासल्यास विनामूल्य रुग्णवाहिका याबरोबरच आयुष्यमान भारत कार्ड सुविधा डॉ.मीनल गजभिये डॉ.भाग्यश्री दगडे, डॉ.प्रमोद सोनकांबळे, डॉ.प्रिया गुरखुदे यांनी ग्रामस्थांच्या आरोग्याची तपासणी केली. काकू-नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्रचार्य तथा कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली क्षीरसागर अमृता आगवान, डॉ.विश्वजीत बोंडार, डॉ.आनंद दाभाडे, डॉ.योगेश धुमक यांच्या समन्वयातून राबवण्यात आले. याशिवास गावातील बबन साठे, बाळासाहेब मुळे, भीमराव साठे, रमेश हागारे, सुनंदा मुळे, योगेश साठे, अशोक काटे, गणेश साठे, राजेश मुळे, बब्रुवान मुळे, सचिन हागारे यांनी शिबिरासाठी विशेष सहकार्य केले.

## भाजपचा सुपडासाफ करणं की आरक्षण मिळवणं ? आंदोलनाचं ध्येय काय?- कवठेकर

बीड। प्रतिनिधी

न लढल्यास भाजपचा सुपडा साफ होणार हे निश्चित.पण हे काही आंदोलनाचं ध्येय नाही.कारण, ओबीसीतून आरक्षण मिळवण्यासाठी आंदोलन उभं राहिलेलं आहे.शिवाय भाजपचा सुपडासाफ झाल्यानंतर जे सत्तेवर येणार आहेत,ते काही ओबीसीतून आरक्षण देणार नाहीत.कारण आज सत्तेवर नसतानाही, ते मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्या! असं साधं म्हणायलाही तयार नाहीत.फडणवीस ब्राह्मण आहेत म्हणून त्यांच्या विरुद्ध रान उठवणे खूप सोपे आहे.पण हेच निवडणुकी नंतरच्या परिस्थितीत मराठा असल्यामुळे खा शरद पवारांविरुद्ध तुम्ही काही बोलू शकणार नाहीत; किंवा त्यांचे काही करू शकणार नाहीत.त्यामुळे न लढण्याचा निर्णय घेऊन फक्त भाजपच संपणार आहे असं नाही, तर आंदोलनाची विश्वासार्हताही संपण्याचा धोका त्यात आहे.तसे जरांगे पाटील खूप प्रगल्भ आहेत.पण आंदोलनाच्या १४ महिन्यानंतरच्या आजच्या परिस्थितीत, निवडणूक न लढवण्याचा निर्णय जर मनोज जरांगे पाटलांनी घेतला, तर त्याला फक्त अविचारच म्हणावा लागेल,असे आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अध्यक्ष शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

निवडणूक लढवण्यापेक्षाही महायुतीचा पराभव महत्त्वाचा मानून जरांगे पाटलांनी लोकसभा निवडणूक लढवण्यास महत्त्व देऊ नये, असे आम्ही लोकसभा निवडणुकीपूर्वीच लिहिले होते.कारण मार्च अखेरपर्यंत जरांगे पाटलांवर टीका करणारे भाजपचे नेते एप्रिल महिन्यात मात्र अचानकपणे जरांगे पाटील व त्यांच्या निवडणूक लढवण्याच्या विचाराचे कौतुक करू लागले होते.म्हणजे फडणवीस व भाजपला हे चांगल्या प्रकारे कळत होते की, जरांगे पाटलांनी आपले उमेदवार दिल्यास त्यांना मराठा समाजाचे मतदान एकतर्फी होईल व उर्वरित मतांमध्ये आपण महाविकास आघाडीला सहज गुंडाळू शकतो.असा भाजपचा विश्वास असल्यामुळे जरांगे पाटलांना कौतुक करून निवडणूक लढण्यास भरीस पाडण्याकरिता भाजपचे प्रयत्न चालू झाले होते.पण जरांगे पाटलांनी न लढण्याचा योग्य निर्णय घेतला व भाजपचे मनसुबे हाणून पाडले.पण त्यामुळे पक्ष म्हणून भाजपचा किती मोठा पराभव झाला हे आपल्याला माहित आहे.आताही तशीच परिस्थिती आहे, पण वेळ मात्र निर्वाणीची आहे. कारण लोकसभा न लढून चालले, पण आता विधानसभा न लढून चालणार नाही. कारण लोकसभा न लढवल्यामुळे ज्यांना त्याचा फायदा झाला त्या महाविकास आघाडीतील एकही नेता त्यांच्या विजयाचे श्रेय जरांगे पाटलांना द्यायला तयार नाही.शिवाय उलट महाविकास आघाडी संधी साधून नव्या जोमाने मराठा समाजाबरोबर बेईमानी करायला सरसावली असल्याचेच दिसत आहे.पण त्यामुळे, महायुती व महाविकास आघाडी मधील फरक स्पष्टपणे दिसून येत आहे.कपटी मित्रापेक्षा दिलदार शत्रू बरा असे आता महाविकास आघाडी व भाजप बाबत म्हणता येऊ शकते.

कारण, देवेंद्र फडणवीस माझ्या पक्षाचा डीएनए ओबीसीचा आहे असे २०२१ पासून म्हणजे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर व त्यांनी मराठा समाजाला २०१८ मध्ये दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर सातत्याने व खूप अभिमानाने म्हणत आले आहेत.मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन उभे राहिल्यानंतरही त्यांनी तसे म्हणण्यात कधी खंड पडू दिलेला नाही.आम्ही प्रथम हिंदुत्ववादी आहोत व त्यानंतर ओबीसीवादी आहोत.मराठ्यांचे विरोधक नसलो तरी आम्ही कुठल्याही प्रकारे मराठावादी किंवा मराठ्यांचे हितचिंतक मात्र निश्चितपणे नाहीत असेच त्यांना म्हणायचे आहे,जे त्यांनी कधीच लपवण्याचा प्रयत्न केलेला नाही.आणि ते मराठाविरोधी आहेत असा आरोप झाल्यानंतरही त्याचा निखालस खुलासा करण्याच्या भानगडीतही ते मुद्दामहून कधी पडले नाहीत,कारण त्यांना तेच हवे होते,हे मनोज जरांगे पाटलांनी लक्षात घ्यायला हवे.

तसेच हे ते सगळं यासाठी करत आहेत की त्यांची सगळी मदार ओबीसी वरती आहे.व त्यासाठी त्यांनी मराठ्यांना १०% आरक्षण देऊन फसवूनही दाखवलेले आहे. त्यामुळे असे म्हणतात की ओबीसी समाजामध्ये आता फडणवीसांबद्दल खूप आदराची भावना आहे. व आपले फडणवीस असा उल्लेख फडणवीसांचा ओबीसींकडून आता केला जातो, जे फडणवीस हे फक्त ओबीसीहितैशी असल्याचेच निदर्शक आहे.कारण आजपर्यंत दोन वेळा केवळ ओबीसींसाठी त्यांनी मराठा समाजाला आरक्षण देऊन फसवलेले आहे.ही मोठी कर्तबगारी देवेंद्र फडणवीसांनी ओबीसींसाठी दाखवलेली आहे. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडी व तिचे खा शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले व विजय वडट्टिवार सारखे चतुर नेते आहेत.या सगळ्यांच्या व्यक्तिमत्वांवरून समाजाशी शिताफीने व धूर्तपणे बेईमानी करण्याचे कौशल्य व कृतघ्नपणाचे प्रदर्शन सहजपणे करण्याची हातोटी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे महायुतीच्या नेत्यांपेक्षा खूप अधिक प्रमाणात आहे, हेच दिसून येते,जे कोणीही नाकारू शकत नाही.त्यामुळे महाविकास आघाडीचा फायदा होईल अशी भूमिका जरांगे पाटलांना आता घेताच येणार नाही.सोबतच देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अपशब्द काढताना एकनाथ शिंदेचे कौतुक करणे व अजित पवारांचा नामोल्लेखही टाळणे बऱ्याच लोकांना पक्षपातीपणाचे वाटते, याकडेही जरांगे पाटलांनी लक्ष दिलेले बरे! कारण एकनाथ शिंदेंमुळे कुणबी प्रमाणपत्राचे वाटप होऊ लागले या कारणासाठी जर त्यांना सहानुभूती दाखवली जात असेल तर तिला गैरच म्हणावे लागेल. कारण स्वप्नातही नसलेले मुख्यमंत्री पद एकनाथ शिंदे यांना ते केवळ मराठा असल्यामुळेच भेटलेले आहे,व शिवसेनेसारख्या पक्षामध्ये उभी फूट पाडूनही त्यांचे राजकीय जीवन सुरक्षित राहिले आहे, ते केवळ ते मराठा असल्यामुळे.

पण जातीचे इतके मोठे लाभार्थी असूनही व महाराजांची शपथ घेऊनही,ओबीसीतुन आरक्षण देण्याचे धारिष्ट्य मात्र एकनाथ शिंदे दाखवू शकले नाहीत, ही त्यांची दुर्बलता समाजासाठी खूप लाजिरवाणी आहे.शिवाय आपल्या या लज्जास्पद दुबळेपणाचे प्रदर्शन, ''मी कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणारच!'', असे ठासून सांगत आजही ते करत आहेत, जे खूप संतापजनक आहे. त्यामुळे फडणवीसांच्या भाजपचा सूपडासाफ करताना महाविकास आघाडी व एकनाथ शिंदे,अजित पवार यांना मदत होईल अशी भूमिका जरांगे पाटील यांनी घेता कामा नये.म्हणून विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेणे व तोही कोणत्याही पक्षाशी किंवा नेत्याशी आघाडी किंवा युती न करता घेणे हाच जरांगे पाटलांच्या आंदोलनासाठी योग्य पर्याय आहे.कारण आता निवडणूक लढवणे हेच जरांगे पाटील यांच्यासाठी आंदोलन असू शकते.तसेच लोकांना लढणाराच नेता आवडतो, परिणामांस भिऊन न लढण्याची भूमिका घेणारा नेता लोकांना आवडत नाही.शिवाय, लढायचे की पाडायचे? याचा निर्णय घेऊ असे पाटील म्हणतात.पण असे करता येत नसते.कारण लढण्याच्या निर्णयामध्येच पाडण्याचा निर्णय अंतर्भूत असतो.नुसत्या पाडण्याचा निर्णय घेण्याच्या मुळाशी आपलेपणा व परकेपणा असा भेदभाव दिसतो.पण खऱ्याने तर गरजवंत मराठ्यांना कोणीच आपले नाही हे ओळखून मनोज जरांगे पाटलांनी निवडणूक लढवण्याचा गाभीर्याने विचार करावा, म्हणजे त्यांच्या लक्षात येईल की निवडणूक लढवणे हाच आपल्यासाठी सर्वोत्तम पर्याय आहे.शिवाय,राज्यात सहा कोटींच्या संख्येने असलेला मराठा समाज किती प्रमाणात एकजूट झाला आहे ते सुद्धा निवडणूक लढल्यावरच कळू शकते.कारण,आजपर्यंत नेत्यांच्या सभेला प्रचंड संख्येने आलेल्या लोकांनी मतदान मात्र केलेले दिसलेले नाही.म्हणून मराठा समाजामध्ये काही बदल झालाय की नाही? की,आजही तो प्रस्थापितांच्याच प्रभावाखाली आहे,हेही कळणे खूप गरजेचे आहे,असे प्रसिध्द केलेल्या पत्रकातून शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.२० ऑक्टोबर २०२४


# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तीन लाख ६७ हजार शेतकऱ्यांना शून्य वीजबिल

छत्रपती संभाजीनगर

शेतकऱ्यांच्या सभेने घातला सरकारचा चौदावा एप्रिल ते जून २०२४ च्या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून ३११ कोटी २४ लाख रुपयांची रक्कम महावितरणला प्राप्त झाली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना वीजबिल प्राप्तीच्या पावत्या म्हणजेच शून्य वीजबिलांचे वितरण महावितरणकडून करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार एप्रिल २०२४ पासून राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील ३ लाख ६७ हजार ६७४ कृषिपंपधारक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

राज्यात महावितरणचे राज्यात ४७ लाख ४१ हजार कृषिपंपधारक वीजग्राहक आहेत. या कृषिपंपांकडून ३९ हजार २४६ दशलक्ष युनिट वार्षिक वीजवापर होतो. शेती मुख्यत्वे पावसावर अवलंबून आहे व अनियमित पर्जन्यमानामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना जाहीर केली. त्याची अंमलबजावणी महावितरणकडून करण्यात येत आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार राज्यातील शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्याचा व त्यासाठी १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान महावितरणला देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार एप्रिल ते जून २०२४ या कालावधीकरिता राज्यातील ४४ लाख ३२ हजार ३९७ शेतकऱ्यांच्या बिलापोटी २७५० कोटी रुपये राज्य शासनाने महावितरणला अदा केले आहेत.




६ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शून्य वीजबिलांच्या पावतीचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्तेप्रातिनिधिक रूपात झाले. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी हा धनादेश स्वीकारला होता. यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या. एप्रिल ते जून २०२४ या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून ३११ कोटी २४ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांना वीजबिलाची रक्कम प्राप्त झाल्याची पावती वितरित करण्यात आली आहे.

## हरभऱ्याचे काबुली वाण व त्यांची वैशिष्ट्ये

हरभरा हे रब्बी हंगामातील कमी पाण्यावर येणारे कडधान्य पीक आहे. मानवी आहारात या पिकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हरभऱ्याच्या काबुली वाणास बाजारात चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी काबुली हरभऱ्याची लागवड करतात. हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत करता येते. काबुली हरभऱ्याच्या वाणांची माहीती आपण जाणून घेऊया.

विराट : हा वाण ११० ते ११५ दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये सरासरी ११ क्विंटल प्रति हेक्टर तर बागायती क्षेत्रामध्ये सरासरी १९ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. अधिक टपोरे दाणे व मर रोगास प्रतिकारक्षम वाण आहे. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम मिळते.

कृपा : या वाणाचा कालावधी १०५ ते ११० आहे. मर रोगास प्रतिकारक्षम असून सफेद पांढरे दाणे आहेत. बागायतीमध्ये १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. या वाणापासून जास्त टपोरे दाणे मिळतात.

पीकेव्हीके-२ : हा वाण १००-१०५ दिवसात काढणीस येतो. मर रोगास प्रतिकारक्षम असून अधिक टपोरे दाणे मिळतात. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ४० ग्रॅम मिळते. बागायती क्षेत्रात या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते.

पीकेव्ही- ४ : हा वाण मररोगास प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून अधिक टपोरे दाणे मिळतात. हा वाण १०० ते ११० दिवसांत तयार होतो. प्रतिहेक्टरी सरासरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळते.

बीडीएनजीके-७९८ : उभट पसरणारा हा वाण असून मध्यम आकाराचे दाणे असतात. हा वाण मररोग व खुजारोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी ११० ते ११५ दिवस आहे. या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.



## गहू लागवडीसाठी सुधारीत वाणांची निवड

गहू हे राज्यात रब्बी हंगामात घेतले जाणारे महत्त्वाचे अन्नधान्य पीक आहे. गहू हे पीक जिरायत व बागायती अशा दोन्ही प्रकारे घेतले जाते. देशाच्या सरासरी उत्पादनाचा विचार करता गव्हाचे सरासरी उत्पादन कमी आहे. सुधारीत वाणांचा वापर न करणे, अपूरे पाणी व्यवस्थापन, कोरडवाहू गव्हाची लागवड अशी उत्पादन कमी येण्याची कारणे आहेत. गव्हाच्या उत्पादनवाढीसाठी सुधारीत वाणांचा वाणांचा वापर करणे महत्त्वाचे आहे.पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड बागायती गहू लागवडीसाठी करावी. तसेच भरखते व रासायनिक खताचा योग्य वापर केल्यास मध्यम जमिनीतही चांगले उत्पादन मिळते. जिरायती गव्हाची लागवड जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीत करावी.

पेरणीची वेळ : जिरायती गव्हाची लागवड करायची असल्यास त्याची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. बागायती गव्हाची पेरणी वेळेवर म्हणजेच नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर केल्यास प्रत्येक आठवड्यात हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादनात घट येते.

जमिनीची मशागत : गहू पिकाच्या मुळ्या जमिनीत खोलवर जातात.



त्यामुळे गहू लागवडीपूर्वी जमीन भुसभुशीत असणे आवश्यक आहे. खरीप पीक काढणीनंतर १५ ते २० सें.मी. खोलीवर जमिनीची नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. त्यामुळे जमीन भुसभुशीत होते. शेवटच्या कुळवणीपूर्वी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत पसरावे.

गव्हाचे सुधारीत वाण : बरेसचे शेतकरी भात पिकानंतर गहू पिकाची लागवड करतात. भात पीक काढणीनंतर गहू लागवड करायची असल्यास तसेच दोन ते तीन पाण्याच्या पाळ्यांची सुविधा असल्यास उशिरा पेरणीसाठी निफाड- ३४ या वाणाची निवड करावी. या वाणाची शिफारस उशिरा बागायती पेरणीसाठी करण्यात आली आहे. एन आय ए डब्ल्यू-३०१ (त्र्यंबक), एन आय ए डब्ल्यू-९१७ (तपोवन), एम ए सी एस-६२२२ हे सरबत्ती वाण व एन आय डी डब्ल्यू-२९५ (गोदावरी) हा बक्षी वाण बागायती वेळेवर पेरणीसाठी योग्य आहे. बागायती उशिरा पेरणीसाठी एन आय ए डब्ल्यू- ३४ आणि ए के ए डब्ल्यू-४६२७ या वाणाची तर जिरायती पेरणीसाठी एन आय डी डब्ल्यू- १५ (पंचवटी) ए के डी डब्ल्यू- २९९७-१६ (शरद) हे वाण उपयुक्त आहेत. पाण्याची उपलब्धता कमी असल्यास एन आय ए डब्ल्यू- १४१५ (नेत्रावती) व एच डी २९८७ (पुसा बहार) या सरबती वाणांची लागवड करावी.

## सुधारित पद्धतीने रब्बी हंगामातील मोहरी लागवड

मोहरी हे रब्बी हंगामातील महत्त्वाचे, कमी खर्चाचे आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पीक आहे. मोहरीच्या बियांमध्ये ३२ ते ४० टक्के तेलाचे प्रमाण असते. मोहरीच्या कोवळ्या हिरव्या पानाची भाजी आरोग्याला उत्तम असते. भरपूर प्रमाणात मॅग्नेशिअम तसेच 'अ' आणि 'क' ही आवश्यक जीवनसत्त्वे असतात. मोहरीच्या ढेपेमध्ये चांगल्या प्रमाणात प्रथिने असून दुधाळ जनावरांकरिता उपयुक्त खाद्य आहेत.

हे पीक साधारणपणे: दोन किंवा तीन ओलिताच्या पाळ्या दिल्यास चांगले उत्पादन देते, त्यामुळे कमी पाण्यामध्ये या पिकाचे चांगले उत्पादन मिळते. योग्य वेळी पेरणी केली तर कीड आणि रोगांचा फार कमी प्रादुर्भाव होतो. मोहरी पिकामध्ये असलेल्या ग्लुकोसिनोलेट या घटकामुळे रानटी आणि मोकाट जनावरांचा उपद्रव कमी होण्यास मदत होते. शेंगा परिपक्व होण्याच्या अवस्थेमध्ये पक्षापासून संरक्षण करण्याची आवश्यकता नसते. मध्यम खोल जमीन किंवा खारवट जमिनीत या पिकाची लागवड करावी. पीक परिपक्व होत असताना झाडांची सर्व पाने जमिनीवर गळून पडतात. ही पाने जमिनीत कुजल्यामुळे सेंद्रिय पदार्थाचे प्रमाण वाढते. सोयबीन नंतर मोहरी पिकाची लागवड करावी. पूर्व विदर्भात खरिपात भात काढणीनंतर मोहरी लागवड करावी. जातीची लागवड करून रब्बीमध्ये मोहरी पिकाची लागवड करणे अधिक फायद्याची ठरू शकते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने प्रती हेक्टरी १२ क्विंटल उत्पादन देण्याची क्षमता असलेली टीएएम १०८-१ ही जात विकसित केली आहे. लागवडीसाठी मध्यम ते भारी प्रकारची जमीन तसेच पाण्याचा चांगला



निचरा होणारी जमीन निवडावी. खरीप पिकाची काढणी झाल्यानंतर जमीन खोलवर नांगरून आडवी उभी वखरणी करून चांगली भुसभुशीत करावी. ओलिताखाली पीक घ्यावयाचे झाल्यास वखराच्या किंवा सारा यंत्राच्या साह्याने सारे पडावेत, यामुळे पाणी चांगले समप्रमाणात देणे सोपे जाते. साधरणपणे प्रति हेक्टरी ५ ते ६ किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास तीन ग्रॅम थायरमची प्रक्रिया करावी. बियाण्याची चांगली उगवण होण्यासाठी पेरणीच्या आधी रात्री बियाणे ओलसर पोत्यात ठेवावे.

पेरणी ऑक्टोबरचा शेवटचा पंधरवडा ते नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. पेरणी करताना दोन ओळींतील अंतर ४५ सेंमी ठेवावे. दोन झाडांतील अंतर १० ते १५ सेंमी ठेवावे. बियाणे आकाराने लहान असल्यामुळे बियाण्याच्या आकाराची वाळू सम प्रमाणात मिसळूननंतर पेरणी करावी. यामुळे बियाणे सर्व क्षेत्रात समप्रमाणात पडेल. बियाण्याची चांगली उगवण होण्याच्या दृष्टीने पेरणी साधरणत: ३ ते ४ सें.मी. खोलीवर करावी. बियाणे ओलीवर पडेल अशा बेताने पेरावे. कोरडवाहू भागात पेरणी जमिनीत ओल असताना तसेच ओलीताखालील मोहरीच्या पेरणीकरिता पेरणीपूर्वी एक ओलिताची पाळी देऊन वाफसा येताच पेरणी करावी. पाणी देण्यासाठी सारे काढावेत. पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी विरळणी करावी. साधरणत: दोन झाडांतील अंतर १० ते १५ सेंमी राहील यादृष्टीने विरळणी किंवा खाडे भरणी करावी म्हणजे शेतात हेक्टरी १.५ ते २.२ लाख रोपांची संख्या राहील. गव्हाबरोबर आंतरपीक ९:१ किंवा ६:१ तसेच हरभरा पिकाबरोबर ६:१ किंवा ५:२ या प्रमाणात ओलीमध्ये पेरणी केल्यास फायदेशीर ठरते. गव्हाबरोबर आंतरपीक ९:१ किंवा ६:१ या प्रमाणात ओलीमध्ये पेरणी केल्यास फायदेशीर ठरते. हे पीक कोरडवाहू तसेच ओलिताची सोय उपलब्ध असल्यास ओलिताखाली सुद्धा घेऊ शकतो. ओलिताखाली हे पीक घेत असताना हेक्टरी ५० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद या रासायनिक खताची मात्रा द्यावी. हेक्टरी २५ किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद पेरणीच्या वेळेस आणि उरलेले २५ किलो नत्र २५ ते ३० दिवसांनी म्हणजेच पहिल्या पाण्याच्या पाळीच्या वेळेस द्यावे. उत्पादन वाढीसाठी प्रती हेक्टरी २० किलो गंधक आणि १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळीच द्यावे. कोरडवाहू परिस्थितीत प्रती हेक्टरी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद द्यावे. कोरडवाहू मोहरीचे अधिक उत्पादनासाठी शिफारशीत खत मात्रेसह ५० टक्के फुलोरा अवस्थेत १ टक्का युरियाची पिकावर फवारणी करावी.

सुधारित जाती आणि गुणधर्म :

जात फुलोऱ्यावर येण्याचा कालावधी (दिवस) परिपक्व होण्याचा कालावधी (दिवस) हेक्टरी उत्पादन (क्विंटल) तेलाचे प्रमाण (टक्के) पीडीकेव्ही कार्तिक ४५-५० १०१-१०७ १२-१६ ३७-४०. टीएएम १०८-१ ४५-५० १००-११० ८-१२ ३५-४०. शताब्दी (एसीएन-९) ४०४२ ९५-१०५ ८-१० ३१-४०.

## दिन विशेष

**जागतिक दिवस:**
**लोकशक्ती दिन, जागतिक अस्थिसुषिरता दिन**

### महत्वाच्या घटना

१५६८ : साली मुघल शासक अकबर यांनी चित्तोडगढ वर हल्ला केला.
१७७४ : साली कोलकाता(तत्कालीन कलकत्ता) ही भारताची राजधानी बनली होती.
१८२२ : साली ब्रिटीश वर्तमानपत्र 'लंडन संडे टाईम्स' चा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला होता.
१९०४ : चिली आणि बोलिव्हिया यांनी शांतता करारावर सह्या करून उभय देशांतील सीमा निश्चित केल्या.
१९४७ : अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात (पहिल्यांदाच) राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९६२ : चीनने भारतावर आक्रमण केले. लडाख आणि ईशान्य भारतात (नेफा) चीनचे सैन्य घुसले आणि त्यांनी भारतीय ठाणी काबीज केली.
१९६९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची अकोला येथे स्थापना
१९७० : हरितक्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोरलॉग यांना नोबेल पारितोषिक जाहीर
१९७१ : मंदीच्या तडाख्यामुळे नेपाळमधील रोखेबाजार कोसळला.
१९७३ : सिडनी ऑपेरा हाऊस चे उद्घाटन एलिझाबेथ (दुसरी) यांनी केले.
१९५० : कृ. भा. बाबर यांनी 'समाजशिक्षणमाला' स्थापन केली. नवशिक्षीत आणि ग्रामीण भागातील जिज्ञासूंना ज्ञानाच्या विविध अंगांची ओळख व्हावी यासाठी श्री. बाबर व त्यांच्या कन्या डॉ. सरोजिनी बाबर यांनी या मालेत शेकडो पुस्तके प्रकाशित केली.
१९५२ : केनियामधे आणीबाणी जाहीर करण्यात आली. जोमो केन्याटा व इतर प्रमुख नेत्यांचे अटकसत्र सुरू.
१९९१ : उत्तरकाशी मधे ६.८ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन १,००० पेक्षा अधिक जण मृत्यूमुखी पडले.
१९९५ : 'ट्वेंटिएथ सेंचुरी फॉक्स' या संस्थेकडून हिन्दी चित्रपटांतील अभिनेते देव आनंद यांना 'मॅन ऑफ द सेंचुरी' हा सन्मान जाहीर
२००१ : रंगभूमीवर सुमारे ४० वर्षे विविध प्रयोग करणारे पंडित सत्यदेव दुबे यांना 'विष्णुदास भावे गौरवपदक' जाहीर
२०११ : लिबीयन गृहयुद्ध राष्ट्रीय परिवर्तन परिषदेच्या च्या सैनिकांनी हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांना पकडून ठार केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५५ : गोवर्धनराम त्रिपाठी गुजराथी लेखक, 'सरस्वतीचंद्र' हा गाजलेला चित्रपट त्यांच्याच चार भागांतील कादंबरीवर आधारलेला आहे. (मृत्यू: ४ जानेवारी १९०७ मुंबई)
१८९१ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २४ जुलै १९७४)
१८९३ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ ऑगस्ट १९७८)
१९१६ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (मृत्यू: २९ ऑगस्ट १९६९)
१९२० : साली भारतीय कायदेपंडित, मुत्सद्दी आणि पश्चिम बंगालमधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व पश्चिम बंगाल राज्याचे माजी मुख्यमंत्री, पंजाब राज्याचे माजी राज्यपाल व अमेरिकेचे भारतीय राजदूत अशी अष्टपैलू कामगिरी सांभाळणारे सिद्धार्थ शंकर राय यांचा जन्मदिन.
१९२७ : भारतीय कवी आणि समीक्षक गुंटूर सेशंदर शर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे २००७)
१९३० : साली भारताची राजधानी दिल्ली येथील उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश लीला सेठ यांचा जन्मदिन.
१९६३ : नवजोत सिंग सिद्धू क्रिकेटपटू, समालोचक व खासदार
१९७८ : वीरेन्द्र सहवाग धडाकेबाज फलंदाज

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९० : सर रिचर्ड बर्टन ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर (जन्म: १९ मार्च १८२१)
१९८२ : भारतीय वरिष्ठ नागरी सेवक अधिकारी तसचं, केरळ आणि मध्य प्रदेश राज्यांचे राज्यपाल निरंजन नाथ वांचू यांचे निधन.
१९६१ : व्ही. एस. गुहा मानववंशशास्त्रज्ञ. १९४६ मध्ये त्यांच्या प्रयत्नांनी कलकत्ता येथे भारतीय मानववंशशास्त्र संशोधन संस्था स्थापन झाली. भारतात जनगणनेच्या कार्यात त्यांनी मौलिक भर घातली. (जन्म: )
१९६४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १० ऑगस्ट १८७४)
१९७४ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (जन्म: २० जानेवारी १८९८)
१९८४ : पॉल डायरॅक नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ८ ऑगस्ट १९०२)
१९९६ : दि. वि. तथा 'बंडोपंत' गोखले पत्रकार, युद्धशास्त्राचे अभ्यासक (जन्म:)
१९९९ : माधवराव लिमये समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार (जन्म:१९१५)
२००९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (जन्म: ४ मे १९२९)
२०१० : पार्थसारथी शर्मा क्रिकेटपटू (जन्म: ५ जानेवारी १९४८)
२०११ : मुअम्मर गडाफी लिबीयाचे हुकूमशहा (जन्म: ७ जून १९४२)

# मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही सहभागी करावे-अरविंद लाटकर

## मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा-व्यंकटेश मुंडे






परळी । प्रतिनिधी

आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही मतदान प्रक्रियेत सहभागी करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले. परळी विधानसभा मतदारसंघात सर्वांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी केले आहे. मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन ही परळी शहरात ठीक ठिकाणी करण्यात आले होते.

दि.१९ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी सकाळी ८:३० वा.परळी विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार -२३३ परळी विधानसभा मतदार संघ -परळी यांच्या आदेशानुसार परळी शहरामध्ये अनेक भागातून सायकल रॅलीच्या माध्यमातून विभागा अंतर्गत मतदार जनजागृती करण्यात आली. या प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी सर्व मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून इतरांनाही मतदान करण्यासाठी सहभागी करावे असे आवाहन केले. तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार व श्री. व्यंकटेश मुंडे यांनी मतदार जनजागृती साठी सर्वांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. या रॅली मध्ये परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, बाल विकास प्रकल्प अधिकारी कालिदास बडे,दराडे, शिक्षण विस्तार अधिकारी हिना अन्सारी, उपमुख्यधिकारी संतोष रोडे, तसेच चे श्री गोविंद कराड, शाम अघाव, श्रीमती सुरेखा नागरगोजे, जया इगे, रेखा कोळपकर, अनिता भारती, श्री नंदकिशोर जातकर, महेश जाधव, इम्रान सय्यद, शाम कुलकर्णी, विविध शाळांचे मुख्याध्यापक प्राचार्य तसेच विविध विभागातील अधिकारी कर्मचारी पोलीस प्रशासनातील अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील मतदार, पत्रकार बांधव संख्येने सहभागी झाले होते.

## थोडक्यात



### माहेश्वरी सभेकडून हजारो रुग्णांना दम्याचे औषध वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही दि १६रोजी शहरतील राजस्थानी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कंलंत्री यांच्या दमा औषधीचे सुमारे १५०० रुग्णांना मोफत वाटप माहेश्वरी सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया व सर्व समाज बांधव यानी यशस्वी रित्या केले तेलगाव येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलत्री यांचे दमा या आजारवरील औषधचे वाटप मागील १८ वर्षांपासून माजलगाव तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात येते यावर्षी कोजागिरी पौर्णिमे १५ ऑक्टोबर बुधवार रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालय येथे रात्री १२वाजता कोजागिरीच्या दुधासोबत सुमारे १५०० लोकांनी लाभ घेतला. यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया माजी जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कंलंत्री, डॉ सुरेंद्र कंलंत्री, श्रीनिवास बाहेती, राधेश्याम लोहिया, गोविंद बजाज,राजेंद्र इंदानी संतोषबापू जेथलिया, तालुका सचिव गोपाल मानधने उपस्थित होते. यावेळी संतोषबापू जेथलिया यांनी समाज प्रबोधनपर व्याख्यान दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद जाजू तरं आभार नवल किशोर काबरा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजलगाव माहेश्वरी सभेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

### प्रदीप जोगदंड यांचे नेट परीक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

येथील रहिवाशी व ज्येष्ठ शिक्षक नेते यू.के. जोगदंड सर यांचे चिरंजीव व जनता कनिष्ठ म हाविद्यालय पोहरेगाव तालुका रेनापुर जिल्हा लातूर या कनिष्ठ महाविद्यालयात माध्यमिक शिक्षक म्हणून काम करीत असलेले प्रदीप उत्तमराव जोगदंड यांनी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली नेट ही पास झाले असून या अगोदर यांनी सेट (महाराष्ट्र स्टेट एलिजिबिलिटी टेस्ट) परीक्षा मध्ये एक मिळवले आहे म्हणून सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या सेट नेट या दोन्ही परीक्षा पास होऊन यश मिळवले आहे अत्यंत उच्च विद्याविभूषित प्रदीप जोगदंड यांनी यापूर्वी एम.ए. इंग्लिश, एम.ए.मराठी, एम.ए. इतिहास, व एम.एड या नंतर आता त्यांनी सेट व नेट परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवले आहे. तसेच त्यांनी माध्यमिक शिक्षक म्हणून नियुक्त होण्या साठी आवश्यक असलेले सीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊन पोहरेगाव येथील जनता विद्यालय सह शिक्षक म्हणून नियुक्त मिळवली आहे त्यांच्या येशा बदल जनता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थाचालक यांच्यासह माजलगाव आतील त्यांचे वडील शिक्षक नेते यु.के. जोगदंड सर यांच्यासह सर्व मित्र परिवार व माजलगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, ज्येष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, ज्येष्ठ पत्रकार तानाजी शिरसाठ, पत्रकार किशन भदर्गे यांच्यासह प्रदीप जोगदंड सर यांच्या मित्र परिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## महायुती जर रिपब्लिकन पक्षाला जागा सोडणार नसेल तर महायुतीतुन बाहेर पडा-भास्कर रोडे



परळी । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) हा पक्ष २००९ पासुन भाजप सोबत युती मध्ये आहे तेव्हापासुन आजपर्यंत झालेल्या एकाही निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एक ही लोकसभा किंवा विधानसभेची जागा सोडलेली नाही.रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष मा. ना. रामदासजी आठवले यांना देखील कॅबिनेट मंत्री न करता त्यांना राज्यमंत्री पदावर कायम ठेवले आहे . रिपब्लिकन पक्षाला विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त आमदारकी देखील मिळणे गरजेचे होते परंतु आज जाहीर झालेल्या यादीत रिपब्लिकन चेहरा न दिसल्यामुळे अनेक इच्छुक जेष्ठ नेते देखील ह्या प्रकारामुळे संभ्रमात पडले आहेत कि महायुती आपल्या पक्षासोबत अस का करत आहे . त्यामुळे रिपब्लिकन पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मनात महायुती व विशेषतः भाजप विषयी नाराजी वाढली आहे कारण रिपब्लिकन पक्षाची युती हि भाजप सोबत मागच्या १० वर्षाची आहे व काल परवा आलेल्या पवार व शिंदे यांच्या पक्षाला महत्व देवून आंबेडकरी पक्षाला विधानसभा व लोकसभे मधुन वंचित ठेवण्याच काही कारस्थान तर रचले जात नाही ना याबाबत पक्षाच्या अनेक निष्ठावंत नेते , पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मनात विचार येत आहेत .कारण नोंदणीक्रुत रिपब्लिकन पक्षाला जर राजकीय मान्यता मिळवायची असेल तर विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करुन निवडुन आणणे व पक्षाला सहा टक्के मते मिळवणे गरजेच आहे .अस असताना महायुतीने नेते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रिय अध्यक्ष ना. रामदासजी आठवले यांच्या १० ते १२ जागा रिपब्लिकन पक्षाला मिळाल्या पाहीजे ह्या मागणी कडे दुर्लक्ष करत आहेत अस दिसत आहे व त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार नाराज होताना दिसत आहेत. रिपब्लिकन पक्षाकडे निवडुन येणारे अनेक इच्छुक उमेदवार आहेत त्यांना जर आता रिपब्लिकन पक्षाने तिकिट देवून नाही लढवू शकले तर रिपबंलिकन पक्ष भविष्यात कधीही मान्यता प्राप्त पक्ष बनु शकणार नाही परंतु महायुतीच्या व भाजपच्या हे लक्षात येत नाही व ह्याप्रकारच्या वागणुकीमुळे २०२४ च्या जाहीर झालेल्या निवडणुकीत याचा फटका महायुतीला बसु शकतो महाराष्ट्रातील आंबेडकरी समाजाची मागणी वाढत आहे

## अल्पसंख्याक आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची निवड



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या व युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या विविध पदांच्या कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्य मार्गदर्शनाखाली अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे यांच्याहस्ते शनिवार दि १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे अल्पसंख्याक विभागाच्या आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची तर अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्षपदी शब्बीर शेख व युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका सचिवपदी शहाजी भोसले तर जोगेश्वरी पारगाव गण प्रमुखपदी सतीश जेवे, सहाय्यक गणप्रमुखपदी लक्ष्मण जगताप यांची निवड करण्यात आली आहे.

आष्टी शहरातील सामाजिक क्षेत्रात व अल्पसंख्याक समाजाच्या व युवकांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवणारे अडीअडचणीत साथ देणारे जिशान सय्यद यांची ओळख असून त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, अल्पसंख्याक यांच्या मान्यतेने अल्पसंख्याक विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख व राष्ट्रवादी काँग्रेस युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष राहुल काकडे यांच्या हस्ते अल्पसंख्याक विभागाच्या आष्टी शहराध्यक्षपदी जिशान सय्यद यांची तर अल्पसंख्याक विभागाच्या तालुका उपाध्यक्षपदी शब्बीर शेख तर युवक काँग्रेसच्या तालुका सचिवपदी शहाजी भोसले,जोगेश्वरी पारगाव युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या गणप्रमुखपदी सतिश जेवे, सहाय्यक गणप्रमुखपदी लक्ष्मण जगताप यांची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आणि त्यांचे स्वागत केले.यावेळी सामाजिक न्याय विभाग तालूका अध्यक्ष अतुल शिंदे, तौफिक शेख,भैरव चव्हाण, जल्लाल शेख, हाफिज मोसिम सय्यद,मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख,गणेश धुमाळ, जुबेर सय्यद,आबेद सय्यद,अजिम खान,जहिर काझी, चांद. खा. पठाण,अरबाज कुरेशी,अदनान सय्यद,इंनुस मामु, आनंद भालेराव, शकील पठाण बब्बू खान, सादिक शेख, हनु जेवे, रमेश जेवे, सुलतान सय्यद, जाहीर पठाण, अतीक कुरेशी,समीर पठाण,मुजामिल सय्यद, मोहसीन पठाण,जमीर पठाण, आसिफ सय्यद, तयुब सय्यद, प्रवीण जेवे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवडीबद्दल माजी आ साहेबराव दरेकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड नरसिंह जाधव,विधानसभा अध्यक्ष राम खाडे, तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, अण्णासाहेब चौधरी, किशोर हंबर्डे, अमोल तरटे, युवक प्रदेश सचिव ॲड रिजवान शेख, युवक तालुका अध्यक्ष ऋषिकेश दरेकर, संतोष सानप,किशोर मुळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.

## आष्टी मतदार संघात शिवाजी राऊत यांच्या रुपात ओबीसी चेहरा देणार का?



आष्टी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची धामधुम जोरात सुरु झाली आहे. आष्टी विधानसभा मतदार संघात उमेदवारीची रस्सीखेच सुरु झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार) गट ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड जि.प.चे माजी अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत यांनी धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी घेतली.यामधून समाजाची दशा व दिशा याविषयावर चिंतन करण्यात आले.धनगर समाजाला मिळणारे स्थान आणि यामधून समाजाची होणारी कुचंबना यावर विचार मंथन करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले.आजपर्यंत आपणसर्व समाजाला सहकार्य केले.

आता ओबीसी समाजातील उमेदवाराला सहकार्य करून विधानसभेची जागा ही धनगर समाजातील ओबीसीचा एक आश्वासक चेहरा म्हणून डॉ.शिवाजी राऊत यांनी लढवावी अशी मागणी कार्यकर्त्यांमधून करण्यात आली आली. यावेळी सांगण्यात आले की,या मतदार संघामध्ये धनगर समाजाच्या मतांची संख्या ही सुमारे ४६ हजार आहे. त्यामुळे धनगर समाजातील उमेदवाराला प्राधान्य द्यावे अशी भूमिका मांडण्यात आली. यावेळी डॉ.शिवाजी राऊत यांनी सांगितले की,आजपर्यंत अनेकवेळा आश्वासने देऊन आम्हाला थांबवण्यात आले कधी विधान परिषदेवर तर कधी राज्यपाल कोट्यातून आमदार व करू,कधी महामंडळ देऊ अशी फक्त आश्वासने देण्यात आली परंतु आजपर्यंत एकही आश्वासन पूर्ण करण्यात आले नाही.आजपर्यंत आम्ही सर्व समाजातील घटकांना सोबत घेऊन काम करत आहोत अनेक वेळा सर्वांना सहकार्य करून आमदार केलेले आहे. त्यामुळे आता आमच्या समाजातील आमदार झाला पाहिजे. ही भूमिका सर्व समाजाची आहे त्यामुळे आपण पक्षाकडे विधान सभेसाठी उमेदवारीची मागणी केलेली आहे.

त्यावर विचारमंथन करण्यासाठी समाजातील सर्व घटकाला सोबत घेऊन या पुढच्या काळामध्ये आष्टी, पाटोदा,शिरूर मतदार संघातील धनगर समाजाचा मोठा मेळावा घेऊन आपण राजकीय भूमिका स्पष्ट करणार आहोत असे डा.राऊत यांनी सांगितले.

यामुळे मात्र आष्टी विधानसभा मतदार संघातील वातावरण यामुळे ढवळून निघणार आहे.या पुढच्या काळामध्ये डॉ.शिवाजी राऊत काय भूमिका घेणार ? याकडे सर्व राजकीय पक्षांचे व मतदार संघातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## जुन्या पेन्शनसाठी प्राणाची बाजी लावणार -प्रा. राहुल कांबळे



वडवणी/प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा.राहुल कांबळे यांनी शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विनाअनुदानित,अंशतः अनुदानित शाळा,कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासनाने टप्पा वाढीव अनुदान मंजूर करावे या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर हुंकार आंदोलन सुरू करून यशस्वी केल्याबद्दल त्यांचा अंशतः अनुदानित शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम गुरुवार दि.१७ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराणी ताराबाई विद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवानेते संजयभाऊ आंधळे होते तसेच सत्कारमूर्ती प्रा.राहुल कांबळे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे हे उपस्थित होते,छत्रपती शाहू विद्यालयाचे दीपक वडमारे सर आदि मान्यवर म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे मान्यवर प्राचार्य राऊत सर शुभेच्छा पर विचार व्यक्त करताना म्हणाले की,प्रा.राहुल कांबळे यांनी ऊन,वारा,पाऊस याची तमा न बाळगता खूप मेहनतीने,जिद्दीने आंदोलन केले हुंकार आंदोलन डॅमेज करण्याचा प्रयत्न झाला पण त्यांनी आंदोलन यशस्वी करून दाखवले हजारो शिक्षकांना २० अनुदान टप्पा वाढ झाल्यामुळे आर्थिक लाभ होणार आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो असे ते म्हणाले त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्ती प्रा.राहुल कांबळे यांना हार,गुलाल,शाल,बुके व कुटुंबातील जोडआहेर भेट देऊन,पेढा भरून यथोचित सत्कार करण्यात आला तसेच मान्यवरांनी शिक्षक समन्वय संघाचे शिलेदार प्रा.दीपक वडमारे यांचा ही हार,शाल आणि भुके देऊन,पेढा भरून सत्कार केला तर वडवणी येथील,छत्रपती शाहू विद्यालयाच्या वतीने सत्कारमूर्ती प्रा.राहुल कांबळे यांना हार,टोपी,गमजा आणि पुष्पगुच्छ देऊन दीपक वडोमारे सर व महानोर सर यांनी सत्कार केला. या सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती प्रा.राहुल कांबळे सर म्हणाले की,जवाब दो आंदोलन,महाएल्गार आंदोलन आणि हुंकार आंदोलनाच्या माध्यमातून विनाअनुदानित,अंशता अनुदानित शिक्षकांना तीन अनुदानाचे टप्पे मिळाले आहेत राहिलेले वाढीव अनुदानाचे टप्पे सुद्धा शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून मिळवणार आणि हक्काच्या जुन्या पेन्शन साठी प्राणाची भाजी लावणार व जुनी पेन्शन मिळवणारच व माझा जो या ठिकाणी सत्कार केला त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे असे विचार त्यांनी व्यक्त केले तसेच दीपक वडमारे सर यांनी सुद्धा हुंकार आंदोलनातील काही प्रसंग सांगितले तर डोईफोडे सर यांनी शुभेच्छा आपले विचार व्यक्त केले त्यानंतर अध्यक्षीय समारोप पर विचार व्यक्त करताना युवा नेते संजय भाऊ आंधळे म्हणाले की,मी प्रत्यक्ष आंदोलन स्थळी गेलो होतो ऊन,पाऊस,वारा याची तमा न बाळगता चिखलामध्ये बसून ज्यांनी आंदोलन केले आपले कुटुंब वाऱ्यावर सोडून तब्बल ६१ दिवस आझाद मैदानावर ठाण मांडून आंदोलन केले त्यांच्यामुळे ६६६३८ शिक्षकांना वाढीव २० अनुदान टप्प्याचा फायदा होणार आहे आपल्या शाळेतील कर्मचारी राहुल कांबळे सर यांचा महाराष्ट्रामध्ये नाव झालं त्याचा आम्हाला अभिमान आहे असे बोलून सत्कार मूर्तींचे अभिनंदन केले.

या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी विद्यालयातील श्री.सुनील कुलकर्णी सर,श्री.चोले सर,श्री.घोळवे सर,श्रीमती फलके मॅडम,श्रीमती नलावडे श्री.तांबडे सर,श्री.विष्णू मंत्रे सर,श्री.डोंगरे सर,श्री.डमरे सर,श्री.सावंत सर,श्री.कनाके सर,श्रीमती दंदे मॅडम,श्रीमती मंत्रे मॅडम,श्रीमती चांदेकर,श्रीमती कुंडगीर मॅडम,श्रीमती टकले मॅडम,प्रा.डाके सर,प्रा.केदार सर,प्रा.मुंडे बी.डी.,प्रा.राठोड सर,प्राध्यापिका कचरे मॅडम,प्राध्यापिका उघडे मॅडम तसेच छत्रपती शाहू विद्याल्याचे महानोर सर यांच्या सह अनुदानित,अंशतःअनुदानित शिक्षक,शिक्षिका-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व उपस्थितांचे आभार उपप्राचार्य मस्के सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व अंशतः अनुदानित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आरोग्य हीच खरी संपत्ती -हांगे



पाटोदा । प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसाचे आरोग्याकडे दुर्लक्ष्य होत चालले आहे, ज्ञानार्जन किंवा कामात सतत व्यस्त राहिल्यामुळे नियमित आहार, व्यायाम व खेळ याकडे दुर्लक्ष्य होत आहे. माणसाला हवी तितकी संपत्ती कमावता येऊ शकते पण त्यापेक्षा मौल्यवान माणसाचे शारीरिक व मानसिक आरोग्य असते म्हणून सर्वांनी उत्तम आरोग्य जोपासण्यासाठी जागृत राहिले पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले.

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या आरोग्य समितीमार्फत १९ ऑक्टोबर रोजी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

व्यासपीठावर पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. आरोग्य तपासणी शिबिरात एकूण ५२ जणांची रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी तर एलएफटी, केएफटी, कोलेस्ट्राल, सीबीसी तपासणीकरिता एकूण ८१ सहभागींचे रक्तनमुने संकलित करण्यात आले.शिबिराच्या यशस्वितेसाठी पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य जायभाये, तंत्रज्ञ अनिल ढेरे, विजय मिसाळ, ओम घुले यांचे मौलिक सहकार्य लाभले.आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. अभय क्षीरसागर, प्रा. गणेश बनकर, प्रा. इरफान शेख यांनी शिबिराच्या आयोजनाकरिता विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. इरफान शेख यांनी केले. मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा विद्यार्थी, पालक, नागरिक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

cmyk

राज्य लोकतंत्र


रविवार, दि.२० ऑक्टोबर २०२४ | ६

# हजार ग्रामपंचायतीमधून केवळ १५ ग्रामपंचायती 'हर घर जल' घोषित

## येत्या पाच महिन्यात ९८५ ग्रामपंचायती कशा पूर्ण होणार? आमदनी अठन्नी आणि खर्चा रुपया अशी पाणीपुरवठा विभागाची स्थिती

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जवळपास १००० ग्रामपंचायतीमध्ये हर घर नल से जल ही योजना मोठ्या दिमाखात चालू झाली. मात्र सुरुवातीपासूनच यामध्ये अनेक अडचणी येत गेल्या. सुरुवातीला आराखडे बनवण्यापासून ते टेंडर देण्यापर्यंत अनेक वाद झाले. मात्र तरीही तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी पवार यांनी कशालाही न जुमानता काम सुरू केले. कुठल्याही नियमाला धरून अनेक कामे दिली गेली नसल्याने हे काम पूर्ण होऊ शकले नाही .आता केवळ पाच महिने बाकी असतानाच केवळ १५ ग्रामपंचायती हर घर जल घोषित झालेल्या आहेत. तर ९३ ग्रामपंचायती ची कामे १००% पूर्ण झालेली आहेत यावरून असे निदर्शनास आले की जलजीवन मिशनमध्ये मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाला. मात्र त्या प्रमाणात कामे अत्यल्प पूर्ण झाली. केवळ पाच महिने राहिले असताना १५ ग्रामपंचायती हर घर जल घोषित होतात म्हणजे कामाच्या वेग किती आहे हे लक्षात येते. या बाबीकडे यंत्रणेने संपूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे प्रधान सचिवांनी नमूद केले असून अशीच परिस्थिती राहिली तर जिल्ह्याचे काम कसे पूर्ण होणार असे म्हणत




नाराज व्यक्त केली आहे. हे काम शंभर टक्के पूर्ण करणे गरजेचे असल्याने या कामाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद स्तरावर शाखा अभियंता आणि उप अभियंता यांनी प्रयत्न करावेत आणि या ग्रामपंचायती मधील योजना १००% पूर्ण कराव्यात अशा आदेशित केले आहे. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत किमान ५० टक्के ग्रामपंचायती पूर्ण कराव्यात असेही सचिवांनी म्हटले आहे .ही कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शाखा अभियंता आणि उपअभियंता आपल्या स्तरावर प्रयत्न करावेत असेही आदेशित करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत मिशनच्या टप्पा दोन मध्ये तालुका स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजनेच्या अंदाजपत्रकासाठी तांत्रिक सहाय्य संस्था उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र अंदाजपत्रके तपासणी करून त्याला तांत्रिक मान्यता देण्यासाठी तालुका स्तरावर विलंब लावण्यात आल्याने ही कामे रखडली असेही प्रधान सचिव यांनी नमूद केले आहे. या तांत्रिक मान्यता त्वरित देऊन सार्वजनिक शौचालय बांधकाम बांधकामाला सुरुवात करावी. याकडे अभियंत्यांनी जातीने लक्ष पुरवण्याचे या पत्रात म्हटले आहे. याशिवाय प्रत्यक्ष कामाची पाहणी करूनच मूल्यांकन सादर करावे पहाणी न करता मूल्यांकन केल्याचे निदर्शनास आल्यास त्रयस्त तांत्रिक तपासणी अहवालामध्ये तफावत आढळल्यास त्याची जबाबदारी अभियंत्यावर राहील. अभियंतांनी काम पूर्ण झाल्यानंतर अहवाल द्यावा. जिल्ह्यामध्ये त्रयस्त संस्था कामावर नियंत्रण ठेवत असून यांचा अहवाल आणि अभियंत्याचा अहवाल यामध्ये तफावत आढळून आल्यास याची जबाबदारी ही अभियंत्यावर राहील. पुढील दहा दिवसांमध्ये कामे चालू करावीत आणि ती पूर्ण करून घ्यावीत नसता आपणा विरुद्ध शासकीय कारवाई केली जाईल. असे पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी.बी. काकडे यांनी म्हटले आहे.

# सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथे कौटुंबिक स्नेह मेळावा

## मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - शहादेव चौधरी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

माजी.महसुल राज्यमंत्री सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली आष्टी, पाटोदा, शिरूर येथील पुणे जिल्ह्यातील रहिवाशी यांचा कौटुंबिक स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



आष्टी पाटोदा शिरूर येथिल पुणे जिल्हात वास्तव्यास असणारे युवा वर्ग व्यवसायिक व अण्णाचे कार्यकर्ते व मतदार बांधव जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन. युवा उद्योजक बंडू तोडकर व युवा नेते शहादेव चौधरी यांच्या वतीने करण्यात आले आहे कौटुंबिक स्नेह मेळाव्याचे आयोजन रविवार दि २० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता ठिकाण द्रौपदा लॉन्स कस्तुरी चौक हिंजवडी डांगे चौक रोड वाकड येथे आयोजन करण्यात आले आहे तरी जास्तीत जास्त आष्टी विधानसभा मतदारसंघातील मतदार पुणे येथे वास्तव्यास आहेत त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते शहादेव चौधरी यांनी केले आहे.

# गोरगरिबांना कुटुंबाप्रमाणे जपणाऱ्या बदामराव आबांनी कोणाचे नुकसान केले नाही -युधाजित पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

बदामराव पंडित यांनी गेल्या ४० वर्षापासून तालुक्यात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्य करत असताना, गोरगरीब आणि अठरापगड जातीतील लोकांची कामे करून सातत्याने त्यांची सेवा केली आहे. तीन वेळेस आमदार आणि एक वेळेस मंत्री पदावर काम करूनही बदामराव आबा कधी गर्विष्ठपणाने वागले नाही. ४० वर्षात त्यांनी कोणाचेही कोणतेही नुकसान केले नाही. येईल त्याचे प्रामाणिकपणे काम केले म्हणूनच यावेळी गेवराई मतदार संघातील लोकांनी त्यांना



विधानसभेत आमदार म्हणून पाठविण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित यांनी केले आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारीवर विधानसभा निवडणुकीला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे सामोरे जात आहेत. त्यांच्या विजयासाठी शिवसेना जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित हे गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. यावेळी मतदारांशी संवाद साधताना युधाजित पंडित म्हणाले की, गेल्या ४० वर्षापासून बदामराव पंडित हे गेवराई विधानसभा मतदारसंघात गोरगरिब आणि सामान्य माणसाचे प्रामाणिकपणे कामे करत आहेत. आबांनी केलेला विकास म्हणजे केवळ रस्ते, शाळा, पाणीपुरवठा योजना, आणि प्रशासकीय इमारती उभा केल्या यातूनच दिसत नाही तर तालुक्यातल्या प्रत्येक गावातल्या माणसाशी कुटुंबाप्रमाणे नाते जपत त्यांचे सुख-दुःख वाटून घेत जपलेल्या आपुलकीच्या नात्यातून दिसते. दवाखान्याचे काम असो किंवा ◀◀ पान २ वर

# सय्यद अल्लाउद्दीन यांच्या कवितांचा इंग्रजी भाषेत अनुवाद

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी,जि.बीड येथील भाऊ फाउंडेशन आणि सय्यद गुरुजी साहित्य अकादमीचे कार्यवाहक कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या झिंदाबाद.. मुर्दाबाद कवितासंग्रहातील २५ कवितांचा इंग्रजी भाषेत अनुवाद,आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अभय शिंदे यांनी केला आहे.त्यांच्या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन जानेवारी २०२५ मध्ये होणार आहे.संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे यांच्या शुभेच्छा सह,झिंदाबाद..मुर्दाबाद कविता संग्रहाची पहिली आवृत्ती वाचून ज्ञानपीठ विजेते बंगाली साहित्यिक,प्रख्यात अभिनेते गिरीश कर्नाड यांनी पाठवलेले शुभेच्छा युक्त,प्रशंसा पूर्ण,अभिप्रायपत्र पुस्तकात अंकित करण्यात येणार आहे.प्रसिद्ध कवी अजीम नवाज राही,सिसिलिया कारव्हालो, कवी,दिग्दर्शक,नागराज मंजुळे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणाऱ्या एडवोकेट बन्सीधरराव धोंडीबापू हंबर्डे साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

# सोयाबीन,कापसाला आधारभूत किंमत मिळवून देण्यात धनंजय मुंडे अपयशी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी विधानसभा मतदारसंघात अनंत कांडके आणि धनंजय राऊत या शेतकऱ्यांनी कापसाचे पीक हातचे गेले म्हणून सप्टेंबर २०२४ मध्ये आत्महत्या केली.परळी वैजनाथ आणि अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची प्रतिक्विंटल सुमारे ३७००/- ते ४०००/- रुपये भावाने खरेदी-



विक्री होत असून शेतीमालाच्या आधारभूत किंमतीचा कायदा बाजार समितीत पायदळी तुडविला जात आहे.अशा परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे परळीच्या गणेश उत्सवात नट-नट्यावर पैसे उधळीत होते.ही घटना संतापजनक असून धनंजय मुंडे यावर्षीच्या सोयाबीन,कापसाला आधारभूत किंमत मिळवून देण्यात अपयशी ठरले आहेत.अशी टीका शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केली.

सप्टेंबर २०२४ मध्ये गणपती उत्सवाच्या काळात परळी वैजनाथ विधानसभा क्षेत्रात अनंत कांडके आणि धनंजय राऊत या तरुण शेतकऱ्यांनी पावसाने कापसाचे नुकसान झाल्यामुळे आत्महत्या केल्या.त्यावेळी धनंजय मुंडे रश्मीका मंदाना,किर्ती सेनने,हेमामालिनी यासारख्या नट्यावर कोट्यावधी रुपये उधळीत होते.सोयाबीनला प्रतिक्विंटल ६९४५/- रुपये तर कापसाला ९६३४/- रुपये भाव देण्याची शिफारस खुद्द धनंजय मुंडे यांनी ◀◀ पान २ वर

# शासकीय पत्र व्यवहारासाठी १००% मराठी भाषेचा वापर करा

### उपमुकाअ (सा) यांचे विभाग प्रमुखांना पत्र

बीड । प्रतिनिधी

मराठी भाषाही राजभाषा म्हणून मान्यता प्राप्त असून शासनाच्या मंत्रालय स्तरा पासून ते पंचायत समिती स्तरापर्यंत सर्व कामकाज हे शंभर टक्के मराठीतूनच करावे असे आदेश विभागीय आयुक्तांनी दिले असून त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी आदेश काढून सर्व विभागाचे प्रमुख आणि गटविकास अधिकाऱ्यांना मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात

**यापूर्वी कुठली भाषा होती? पूर्वीपासूनच मराठीचा वापर केला जात होता. मात्र तरीही शासकीय आदेश काढून शंभर टक्के मराठीचा वापर करा असे सांगितले जात आहे. मग यापूर्वी शासकीय पत्रव्यवहार हिंदी ,इंग्रजी आणि मराठीतून होत होता काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.**

आदेशित केले आहे.

मराठी ही राज्याची राजभाषा असल्याने सर्वसामान्य माणसाला समजेल अशा भाषेत मराठी भाषेचा वापर करून कार्यालयीन कामकाज आणि त्याचा पत्रव्यवहार करावा असा निर्णय मंत्रालय स्तरावर झाल्यानंतर मंत्रालय स्तरावरून संबंधित विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले. आणि विभागीय आयुक्त यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांना आदेशित केले. या आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी( सामान्य प्रशासन) यांनी एका पत्राद्वारे जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख आणि गट विकास अधिकाऱ्यांना कामकाजासाठी १००% मराठी भाषेचा वापर करावा असे आदेशित केले आहे.

# ही निवडणूक माझ्या एकट्याची नसून तुमच्या स्वाभिमानाची लढाई आहे - धनंजय मुंडे

घाटनांदूर । प्रतिनिधी

हि निवडणूक माझी एकट्याची नसून तुमच्या स्वाभिमानाची लढाई आहे. माझ्या राजकीय कारकीर्दीत कधीच जातीवादाला धारा दिला नाही मी विकासाचे राजकारण केले. असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार धनंजयजी मुंडे यांनी केले. दि१८ ऑक्टोबर शुक्रवार रोजी घाटनांदुर येथील आई मंगल कार्यालयात आयोजित महायुतीच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधताना धनंजय मुंडे बोलत होते. यावेळी जि प अध्यक्ष शिवाजी सिरसाट ,सरपंच महेश गारठे ,गोविंद देशमुख ,राजेश औताडे ,गणेश कराड, रणजित लोमटे, बाळासाहेब देशमुख ,दत्ता जाधव ,दादा वैद्य ,बाबुराव जगताप, ज्ञानोबा जाधव ,प्रदीप वैद्य ,रामराव बडे , केशव गाढवे



,महबूब शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना मुंडे म्हणाले, मी माझ्या राजकीय कारकीर्द नेहमीच जातीपातीचा विचार न करता सामाजिक व विकासाचे राजकारण केले आहे. विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेता असताना सर्व घटकासाठी विधान परिषदेत आवाज उठविला आहे. मंत्री झाल्यानंतर शासकीय कृषी महाविद्यालय सोयाबीन संशोधन उपकेंद्र मतदारसंघात आणले आहे. नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामूहिक विवाहच्या माध्यमातून विविध जाती धर्मातील भगिनीचे विवाह लावून दिले आहेत.विरोधकांचा मला मतदारसंघात आडकवून ठेवण्याचा डाव आहे. ही निवडणूक माझी एकट्याची लढाई नसून सर्वांच्या स्वाभिमानाची लढाई आहे.

# माधव निर्मळ यांना आमदार करण्यासाठी हिंगणीकर सरसावले

## गाव भेट दौऱ्याला मोठा प्रतिसाद; तरुणांमध्ये कमालीचा उत्साह

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघामध्ये ओबीसी नेते उद्योजक माधव निर्मळ यांना आमदार करण्यासाठी हिंगणी खुर्द आणि हिंगणी बुद्रुक या गावातील नागरिक सरसावले आहेत. माधव निर्मळ यांच्या गाव भेट मोठा प्रतिसाद मिळाला असून तरुणांमध्ये उत्साह संचारला आहे.

गेल्या सहा महिन्यापासून माधव निर्मळ हे माजलगाव विधानसभा निवडणुकीमध्ये जोरदार तयारी करत आहेत. गाव गाव त्यांना मोठ्या प्रमाणात



प्रतिसाद मिळत असून त्यांना विजय करण्यासाठी धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक आणि हिंगणी खुर्द या गावातील नागरिक सरसावले आहेत. यावेळी नेते माधव निर्मळ यांनी गांवकरी यांच्याशी संवाद साधला व येणाऱ्या विधानसभा या निवडणूकीमध्ये आशीर्वाद देऊन आपली सेवा करण्याची संधी दयावी असे आवाहन केले व हजारो युवकांना उद्योजक करण्याच्या माणसं व्यक्त केला. यावेळी उपस्थित जेष्ठ भीमानाना गवळी, रावसाहेब माने, संपत दादा माने, सरपंच शिवाजी काळे, मुंजा तंबूड, मेहबूब भाई शेख, बळीराम शेंडगे, भानुदास ढोणे धनंजय वावळे, दशरथ उजगरे, रमेश राव उमाप, गजेंद्र गलांडे, शाहू कोळेकर,शिवाजीराव गवळी, सुरेशराव गवळी, भानुदासराव डोने, बापूराव ढोणे, ज्ञानोबा कोळेकर, राजेभाऊ वावळे बाबासाहेब कोळेकर, रंजीत भैय्या रूपनर, बिभिषण शेंडगे, गणपतराव माने, शिवाजीराव गवळी, दत्ता राऊत, संजय सोळंके, ◀◀ पान २ वर

# मॅटच्या आदेशावरून निवासी उपजिल्हाधिकारी पुन्हा गणेश महाडीक

**जालना । प्रतिनिधी**

निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांना मुंबईत प्रतिनियुक्ती मिळाल्यानंर त्यांच्याजागी गणेश महाडीक यांची निवासी उपजिल्हाधिकारी नियुक्ती झाली होती. मात्र, रुजू झाल्यानंतर अवघ्या ११ दिवसात गणेश महाडिक यांची कोणतीही तक्रार काहीही कारण नसताना शासनाने अंबड येथे उपविभागीय अधिकारी म्हणून बदली करण्यात आली होती. मात्र, या बदलीला मॅटने स्थागिती दिली असून, शुक्रवारी (ता. १८) पुन्हा निवासी उपजिल्हाधिकारी पदाची सुत्रे गणेश महाडीक यांच्याकडे देण्यात आली आहेत. त्यामुळे शासनाकडून एकप्रकारे हा संगीत खुर्चीचा खेळ सुरु असल्याचे स्पष्ट होत आहे.



उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी प्रतिनियुक्तीने मुंबई येथे बदली झाल्यानंतर महिनाभर हे पद रिक्त होते. निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्याकडे प्रभारी पदभार होता. मात्र, त्यानंतर गणेश महाडीक यांच्याकडे निवासी उपजिल्हाधिकारी पदाचे सुत्रे देण्यात आली होती. रुजू झाल्यानंतर अवघ्या ११ दिवसात त्यांना अंबड येथे

उपविभागीय अधिकारी म्हणुन पाठविण्याचे

आदेश आले होते. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी तात्काळ प्रकरण मॅट मध्ये मध्ये दाखल केले व मॅटने बदलीला स्थागित दिल्यामुळे निवासी उपजिल्हाधिकारी पदाचे

# बंजारा समाजाचे नेते रमेश पवार ताकदीने माजलगाव विधानसभा निवडणुक लढणारंच!

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बंजारा समाजाचे नेते व ना.संजय राठोड यांच्या निकटवर्तीय असणारे रमेश पवार हे होऊ घातलेल्या माजलगाव विधानसभा निवडणुकीत भरारी घेणार....



रमेश पवार हे लढाऊ, प्रामाणिक,कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केलेले मोठे नेते आहेत, रमेश पवार हे बीड जिल्हा बंजारा समाजाचे नेते आहेत. मागील २५ वर्षापासून ते विविध सामाजिक चळवळीमध्ये काम करत आहेत.गोर गरीबांचे ,दिन दलितांचे,कामगार,कष्टकरी, शेतकरी यांच्या न्याय मागण्यासाठी शेकडो आंदोलने, मोर्च,रस्ता रोको आंदोलन, त्यांनी केले आहेत.

विशेषतः परभणी कृषी विद्यापीठाला हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व वसंतराव नाईक यांचे नाव देण्याच्या आंदोलनात त्यांचा मोठा वाटा आहे.बंजारा समाजाच्या स्वतंत्र तांड्याना स्वतंत्र ग्रामपंचायतीचां दर्जा देण्याच्या कामासाठी ◀◀ पान २ वर

# बाजार समितीचे सचिव यांच्या हस्ते नाफेड धान्य केंद्राचे उद्घाटन

परतुर । प्रीतनिधी

परतूर येथे नाफेड धान्य केंद्राचे केंद्र उद्घाटन दि १८ ऑक्टोंबर रोजी परतुर कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव आर. बी. लिपने यांच्या हस्ते करण्यात आले. श्री गणेश शेती कृषी साहित्य पुरवठा सहकारी संस्था वाटुर फाटा रोड बाबासाहेब भाऊ आकात यांच्या पेट्रोल पंपाच्या बाजूला श्री गणेश कृषी उपयोगी साहित्यिक पुरवठा शेती सहकारी संस्था यांच्या मार्फत सोयाबीन खरिदी चा शुभारंभ करण्यात आला आहे तरी तालुक्यातीले शेत कऱ्यानी आपले सोयाबीन वाळऊन नाफेड सेंटर



मध्ये विक्रीसाठी घेऊन येणे नाफेड सेंटर मध्ये बारा मावचेर असलेली सोयाबीन खरीदी केली जाईल जास्ती मावचेर असलेला माले घेतला जानार नाही व सर्वसेतकरी बांधवानी आपली ऑनलाइन खरेदी चे फॉर्म भरून घेणे आता सध्याला सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन चालू आहे तात्काळ ऑनलाईन करून घेणे,

परतुर तालुक्यातील शेतकरया नी६५ टक्के सोयाबीन पिक आपल्या शेतात पेरणी केलेली ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# आचारसंहितेदरम्यान आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

उरुळी कांचन । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कलमान्वये निर्बंधांचे आदेश जारी केले आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी दिला आहे.



निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत असलेल्या या आचारसंहितेदरम्यान, उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये शांतता, निर्भय व न्यायपूर्ण वातावरणात निवडणुकीची प्रक्रिया पार पडण्यासाठी विविध कलमान्वये जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी आदेश जारी केले आहेत. अशी माहितीही पाटील यांनी यावेळी दिली. कोणत्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक शिबिरांचे वा मेळाव्यांचे आयोजन करण्यावर निर्बंध राहणार आहेत. परिसरातील नागरिक सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम ॲप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, डीप फेक, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत. कोणाचेही विरोधात घोषणाबाजी, डीजे, फटाके, रंग, गुलाल उधळणार नाही किंवा वाजणार नाही याची काळजी घेण्यात यावी. दरम्यान, निवडणूक काळासाठी काढण्यात येणार्या मिरवणुकींसाठी पोलीस परवानगी बंधनकारक आहे. या आदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

व्हाट्सअप ग्रुपचे ॲडमिन यांनी १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंगमध्ये बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत, जर ॲडमिन यांनी सेटिंगमध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणार्या सदस्यासह ग्रुप ॲडमिनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# विशेष अनुदानातून बारामतीसाठी एक कोटी निधी मंजूर – सुरेंद्र जेवरे

**बारामती । प्रतिनिधी**

नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत बारामती नगरपरिषद करीता १ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे यांनी याबाबत पाठपुरावा केला. मुस्लीम आम जमात कब्रस्थान, मुजावर वाडा अंतर्गत सुधारणा करण्यासाठी १५ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

शिवधाम स्मशानभूमी लिंगायत कोष्टी समाज अंतर्गत सुधारणा करणे २० लाख




राजयोग ध्यानकेंद्र, ओपनस्पेस वाघोलिकर पार्क अशोकनगर बारामती येथील बगीचा अंतर्गत कामे करणे ५० लाख विमलधाम सोसायटी, भिगवण रोड बारामती बगीच्या अंतर्गत कामे करणे १५ लाख ,प्रभाग क्र. १६ येथे ओपन जिम तयार करणे. इत्यादी कामे या निधीच्या माध्यमातून होणार आहेत.

# कामगारांनी चोरले लॅपटॉप; तीन अटक

वाघोली – एक कोटींच्या २८० लॅपटॉप चोरी प्रकरणी वाघोली पोलिसांनी तीन दिवसात तीन आरोपींना जेरबंद करून २४४ लॅपटॉप हस्तगत केले. गुन्ह्यात वापरलेली वाहनेही पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. या प्रकरणी चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून एक फरार आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑक्टोबर रोजी गोदामातच काम करणाऱ्या दोन कामगारांनी गोदामातून २८० लॅपटॉप चोरले ते टेम्पो मध्ये भरून दिले. तो टेम्पो औरंगाबाद येथे पाठविला. तेथे त्यांच्या एका मित्राने ते सर्व लॅपटॉप एका गोदामात ठेवले. त्यानंतर त्यांनी लॅपटॉप विक्रीसाठी थेट उत्तरप्रदेश मधील प्रयागराज येथे नेले. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपास पथक तयार करून जलद तपास सुरू केला होता. पोलीस कर्मचारी अमोल ढोणे व अजित फरांदे यांनी तांत्रिक विश्लेषणा आधारे माहिती काढून तीन आरोपीना ताब्यात घेवून लॅपटॉप हस्तगत केले. चौथा आरोपी फरार आहे.

सुरेश महादेव कुमार,( वय ३५ वर्षे, सध्या रा. उबाळेनगर, वाघोली, मुळ रा. ग्राम सहजपुर, कल्याण ऊर्फ निवाधा, तहसिल सुराव, थाना होलगड, राज्य उत्तरप्रदेश ) शिवाजी जगन्नाथ वसु, ( वय २७ वर्षे, रा. गट नं. ४६, धानेगाव ता. गंगापुर जि. संभाजीनगर ), कुमुद रंजन झा ( वय ३२ वर्षे, रा. प्रियंकानगर, वाघोली ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कस्टडी तिघांना सुनावली आहे. वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक योगेश खटके, सहायक पोलिस निरीक्षक शिरीष भालेराव, पोलीस कर्मचारी अजित फरांदे, स्वप्निल जाधव, अमोल ढोणे, संदीप तिकोणे, विशाल गायकवाड, बाळासाहेब हराळ, सागर कडु, गणेश आव्हाळे, दिपक कोकरे, प्रितम वाघ, गहीनिनाथ बोयणे यांनी ही कामगिरी केली.

# चाकणकर मला बाहेरची म्हणत असेल तर बाहेरुन लढते; रुपाली ठोंबरे चांगलंच संतापल्या

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वीच राज्यातील राज्यातील राज्यपाल नियुक्त आमदारांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे या ७ आमदारांचा शपथविधीही पार पडला. त्यामध्ये, महायुतीमधील भापज पक्षाला तीन, शिवसेनेला २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील २ जणांना संधी देण्यात आली आहे. मात्र, या निवडीनंतर पक्षांतर्गत नाराजीनाट्य सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून पंकज भुजबळ आणि इद्रीस नायकवाडी यांना आमदारकीची संधी मिळाली आहे. दुसरीकडे रुपाली चाकणकर ( ) यांनाही पुन्हा एकदा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संधी देण्यात आली आहे. त्यामुळे, पुण्यातील () राष्ट्रवादीचे काही नेते नाराज झाले आहेत. पुण्यातील राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह राजीनामा



देण्याची तयारी दर्शवली. तर, आता रुपाली ठोंबरे यांनीही रुपाली चाकणकर यांच्या निवडीवर भाष्य करताना टोला लगावला आहे.

मला राज्यपाल नियुक्त आमदार केलं नाही हे मी समजू शकते, संघटना मजबूत झाली पाहिजे त्यासाठी एक पक्ष एक पद हे गणित पाहिजे असं मी दादांना देखील सांगितलं आहे. काही ठिकाणी समजूतदारपणा घ्यावा लागतो, प्रत्येकजण आपल्या राजकीय फायद्यासाठी निर्णय घेत असतो. आम्ही तक्रार दादांना सांगू शकतो, मला सांगितलं तुम्ही तुमचं काम करा. क व्यक्ती एक पद यासंदर्भात देखील निर्णय येत्या काळात घेऊ असं दादांनी म्हटलं आहे.

पक्षात मी नाराज नव्हते, मला राष्ट्रवादी काँग्रेसने स्वीकारलं आहे, पण रुपाली चाकणकर मला बाहेरची म्हणत असेल तर बाहेरुन लढते ना, त्यांचं हे बोलणं चुकीचं आहे, अशा शब्दात रुपाली ठोंबरे यांनी रुपाली चाकणकर यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. चाकणकर यांचं मी पहिले अभिनंदन केलंय, मी संघटनेच्याबाबत बोलत होते, एक पद–एक व्यक्ती न्याय द्यावा, त्यात रुपाली ठोंबरे पाटीलच नव्हे तर इतर महिलांना देखील पदं दिली पाहिजे. मी लोकांमधून निवडून येणारी व्यक्ती, त्यांनी स्वत:वर ओढवून घेऊ नये. त्यांना माझी अडचण काय आहे? की आम्ही सर्व महिला एकत्र येत आहे ही अडचण आहे,अस म्हणत ठोंबरेंनी रुपाली चाकणकर यांना टोला लगावला आहे. मी कसबा विधानसभा मतदारसंघातून तिकीट मागितले होतं, मात्र २०१९ साली तिकीट कापलंच होतं ना, मला त्या पक्षात नवीन आलेल्या म्हणाल्यात, मी मागच्या १९ वर्षांपासून राजकारणात काम करते आहे. आमच्यात वाद नव्हता, त्यांनी गैरसमज करुन घेतलेला आहे, असेही रुपाली ठोंबरे यांनी म्हटलं. दरम्यान, दीपक मानकर यांच्याशी देखील माझी चर्चा झाली आहे, त्यांनी तोडगा काढला आहे, त्यांचीही नाराजी दूर होईल, असेही रुपाली ठोंबरे यांनी म्हटलं.

# मुलीच्या भल्यासाठी दांपत्य पुन्हा एकत्र

पुणे : कौटुंबिक वाद आणि वैचारिक मतभेदांमुळे विभक्त राहत असलेले जोडपे आपल्या सहा वर्षांच्या मुलीच्या भवितव्याचा विचार करत पुन्हा एकत्र आले. गेल्या सहा महिन्यांपासून ते विभक्त राहत होते. त्यांच्यातील वाद विसरून दोघांनी नव्याने संसार सुरू केला आहे. दोघांतील मतभेद मिटविण्यासाठी पती–पत्नीच्या वकिलांचे समुपदेशन महत्त्वाचे ठरले. वेगळे राहत असताना त्यांची मुलगी आईबरोबर राहत होती. तिला आता पुन्हा वडिलांची माया मिळणार आहे. सुरेश आणि रविना (नावे बदलली आहेत) असे या जोडप्याचे नाव आहे. रविना यांच्या वतीने ॲड. राणी कांबळे–सोनावणे, सुरेश यांच्या वतीने ॲड. सोपान योगराज पाटील (मनवेलकर) यांनी न्यायालयात बाजू मांडली.सुरेश आणि रविना यांचा जून २०१८ मध्ये विवाह झाला होता. सुरेश हे व्यावसायिक, तर रविना या गृहिणी आहेत. लग्नानंतर काही वर्षे त्यांचा संसार सुरळीत होता. मात्र, नंतर दोघांत वैचारिक मतभेद निर्माण झाले. मतभेद विकोपाला गेल्यावर रविना मुलीला घेऊन घर सोडून निघून गेल्या. सहा महिन्यांनंतर रविना यांनी नांदायला नेण्याबाबतचा दावा कौटुंबिक न्यायालयात दाखल केला. त्यात पती हजर झाल्यानंतर हे प्रकरण समुपदेशनासाठी पाठविण्यात आले. दोघांच्या वकिलांनी त्यांचे समुपदेशन केले. पती–पत्नी दोघांनी आपापली जबाबदारी पार पाडण्याचे मान्य केले आणि ते एकत्र आले.

# बनावट कागदपत्रांद्वारे ५६१ कोटी रुपयांची जीएसटी कर चुकवेगिरी; एकास अटक

**पुणे । प्रतिनिधी**

बनावट कंपनीच्या नावे कागदपत्रे सादर करून ५६१ कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) चुकविण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात




एकाला अटक करण्यात आली असून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महम्मद रियाझउद्दीन (रा. हैदराबाद, तेलंगण) याला अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी त्याचे साथीदार अब्दुल सलाम ऊर्फ सलीम, नैशाब मलिक नौशाद, सलमान मलिक, शादाब, तन्वीर, ओऑसिस, राजू यादव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत जीएसटी कार्यालयातील अधिकारी रवी भूषणप्रसादसिंग कुमार (वय–३४) यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीविरुद्ध बनावट कागदपत्रे सादर करणे, फसवणूक, तसेच माहिती–तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०२१ पासून हा प्रकार सुरू होता. जीएसटी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी ऑगस्ट महिन्यात एन. एल. ट्रेडर्स या खात्याची ऑनलाइन तपासणी केली. तेव्हा काही व्यवहार संशयास्पद आढळून आले. त्यानंतर जीएसटी कार्यालयातील पथकाने चौकशी सुरु केली. नगर रस्त्यावरील सणसवाडी परिसरात एका भंगार साहित्य खरेदी विक्री करणाऱ्या व्यावसायिकाकडे चौकशी केली. त्यांच्याकडे जीएसटी कर भरणा पावत्यांबाबत चौकशी करण्यात आली. तेव्हा हैदराबाद येथील एस. बी. ट्रेडिंग कंपनीचे सलीम भाई यांनी पावत्या दिल्याची माहिती त्याने दिली. कर पावत्यांबाबत संशय आल्याने याबाबतची माहिती हैदराबाद येथील जीएसटी कार्यालयाला कळविण्यात आली. हैदराबाद येथील पथकाने चौकशी केली. तेव्हा अशा प्रकारची कंपनी तेथे अस्तित्वात नसल्याचे आढळून आले. आरोपी रियाजउद्दीनला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने ५८ कंपन्यांसाठी कर भरणा पावत्या तयार केल्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपी अब्दुल सलाम ऊर्फ सलीम, नैशाब मलिक नौशाद, सलमान मलिक, शादाब, तन्वीर, ओऑसिस, राजू यादव यांची नावे निष्पन्न झाले. करचुकवेगिरी, तसेच कर भरण्याबाबतच्या बनावट पावत्या तयार करण्यासाठी आरोपींनी पैसे दिल्याची माहिती रिजाजउद्दीने जीएसटी पथकाला दिली. रिजाजउद्दीनला ताब्यात घेऊन त्याला अटक करण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संपतराव राऊत या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# वाहतूक कोंडी सोडविणाऱ्या पोलिसांना कोयत्याचा धाक

पुणे । प्रतिनिधी

वाहतूक कोंडी सोडविणार्या पोलिसांना शिवीगाळ करून कोयत्याचा धाक दाखविण्यात आल्याची घटना कोंढवा भागात घडली. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी एका दांपत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

यापकरणी महेश लोणकर याच्यासह त्याच्या पत्नीविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस () शिपाई किरण झेंडे यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस शिपाई झेंडे आणि मेमाणे कोंढव्यातील शिवनेरीनगर परिसरात बुधवारी रात्री गस्त घालत होते. त्या वेळी शिवनेरीनगर परिसरात कोंडी झाली होती. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी झेंडे आणि मेमाणे गेले. त्या वेळी गर्दीत कोयता उगारून आरोपी महेश लोणकर वाहनचालकांना धाक दाखवत होता. या भागातील रहिवाशांना त्याने शिवीगाळ केली. या घटनेची माहिती मिळताच झेंडे आणि मेमाणे तेथे गेले. पोलिसांनी कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. पोलिसांना पाहताच लोणकरच्या पत्नीने त्याच्याकडील कोयता काढून घेऊन लपवला. कोंडी सोडवणार्या पोलिसांना शिवीगाळ, तसेच धक्काबुक्की केली. सरकारी कामात अडथळा आणणे, तसेच बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी लोणकर याच्यासह त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

# जैन राजकीय फोरमची समाजाकडून स्थापना

पुणे, : जैन समाजाला राजकीय क्षेत्रात अधिक कार्यरत करण्यासाठी महावीर प्रतिष्ठान येथे जैन युवक महासंघातर्फे आयोजित समाजातील मान्यवरांच्या बैठकीत जैन समाजाच्या चार संप्रदायातील 'जैन राजकीय फोरम'ची स्थापना करण्यात आली. समाज कार्य करताना त्याची व्याप्ती वाढवायची असल्यास राजकीय क्षेत्रामध्ये जैन समाजाचे प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. समाजातील कार्यकर्त्यांनी राजकारणात जैन समाजाचे प्रतिनिधित्व करीत समाजासाठी काम करण्याच्या उद्देशाने फोरमची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी सकल जैन संघाचे संयोजक अचल जैन, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अभय छाजेड, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बाळासाहेब ओसवाल, भाजपचे प्रवीण चोरबेले, सामाजिक कार्यकर्ते दिलीप मेहता, श्री मूर्तिपूजक युवक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हरेश शाह, सतीश शाह, विलास शहा, नितीन जैन, सकल जैन संघाचे अनिल गेलडा, मिलिंद फडे, नीलेश शहा, भरत सुराणा, संदीप भंडारी, जिनेंद्र कावेडिया, अल्पेश गोगरी, अजय बाफना, महेंद्र सुंदेशा मुथा, जया वोरा, हर्षिता गांधी, डिंपल ओसवाल आदी उपस्थित होते. अचल जैन यांनी सर्वांचे स्वागत करून फोरम स्थापनेमागील भूमिका मांडली. युवक महासंघाचे सचिव समीर जैन यांनी सूत्रसंचालन तर विलास शहा यांनी आभार मानले.

# भयंकर! बिबट्या च्या हल्ल्यात आईसमोर चिमुकल्याचा मृत्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

रात्रीची वेळ...आईच्या मागे येणारा मुलगा..इतक्यात बिबट्याने झडप मारली अन्? आईच्या डोळ्यासमोरुन चिमुकल्याला बिबटयाने उचलून नेले...या हल्ल्यात चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही घटना शिरूर तालूक्यातील मांडवगण फराटा येथे घडली.

वन्स सिंग (वय.७) असे मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव आहे. तर झालेल्या घटनेने परिसर सुन्न झाला आहे. याबाबत सविस्तरअसे की, मांडवगण फराटा येथील दगडवाडी रोड, गोकुळनगर येथे संदीप अशोक घाडगे यांचे उसाचे गुऱ्हाळ आहे. या गुऱ्हाळवर राजकुमार नथू सिंग हे कुटुंबासमवेत कामाला आहेत. राजकुमार सिंग व त्यांची पत्नी रेखा यांच्यात शुक्रवारी घरी असतानाच घरगुती कारणावरून किरकोळ वाद सुरू होता. रात्रीच्या वेळी आई पुढे चालत असताना मागून त्यांचा वन्स हा मुलगा येत होता.आईने मागे येणाऱ्या मुलाचा रडण्याचा आवाज ऐकला असता त्यावेळी त्यांना बिबट्या निदर्शनास आला. यावेळी बिबट्याने आईच्या डोळ्यासमोरच चिमुकल्यावर हल्ला करत उसाच्या शेतात फरफटत नेले. त्यानंतर आईने मोठ्याने आरडाओरडा केला. यावेळी उपस्थित असणाऱ्या गुऱ्हाळ कामगार, उसतोड कामगार व उपस्थित असणाऱ्यांनी शोध घ्यायचा प्रयत्न सुरु केला. दरम्यान पोलीस व वनविभागाला ही कळविण्यात आले. रात्री उशिरा चिमुकल्याला गंभीर जखमी अवस्थेत शोधण्यात यश आले.




रुग्णालयात उपचारांसाठी नेण्यात आले मात्र उपचारापूर्वीच मुलाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान मांडवगण फराटा परिसरात उसाचे क्षेत्र मोठे आहे.अनेक ठिकाणी उसाची तोड सुरू आहे. सातत्याने बिबट्या हा नागरिकांना निदर्शनास येतो मात्र त्यावर ठोस उपाययोजना केल्या जात नाही. त्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. याबाबत गुऱ्हाळचालक संदीप अशोक घाडगे यांनी पोलिसात माहिती दिली आहे.

# वाघोलीतील तरुणीला १० लाखांचा तर तरुणाला तीन लाखांचा गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत वाघोली येथे येथे राहणाऱ्या २८ तरुणीला फोन करून फेडेक्स कुरिअर मधून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या नावाने इराणला जाणाऱ्या पार्सलमध्ये पाच पासपोर्ट, तीन



क्रेडिट कार्ड, दोन किलो कपडे, लॅपटॉप, ४५० ग्रॅम ड्रग्स सापडले आहे. याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेत फिर्याद दाखल झाली आहे. हे प्रकरण मिटविण्यासाठी अधिकाऱ्यांशी फोन जोडून देण्यात आला.

दुसऱ्या घटनेत क्रेडीट कार्डद्वारे परस्पर व्यवहार करून खात्यातून वेगवेगळे ७ व्यवहार करून ३ लाख १५ हजारांची रक्कम सायबर चोरट्यांनी लंपास केली. वाघोली येथील ३२ वर्षीय तरुणाने याप्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पहाटेच्यावेळी व्यवहार करून रक्कम लंपास करण्यात आली असून तरुणाला सकाळी व्यवहारांची माहिती कळाल्यानंतर क्रेडीट कार्ड कंपनीला कळवून सायबर पोर्टल वर तक्रार करत पोलिसात फिर्याद दिली आहे.

# पिंपरी विधानसभेत एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत एकूण ३ लाख ८७ हजार ९७३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदार संघात एका मतदान केंद्रावर मतदारांची संख्या सरासरी ९७५ असणार आहे. तर एकून मतदान ठिकाणे ८७ असून, त्यामधील ३९८ मतदान केंद्रांवर हे मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. या मतदार संघात एकही संवेदनशील मतदान केंद्र नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी पत्रकार परिषदेत दिली. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्वच मतदार संघातील तयारीचा आढावा



घेतला आहे. काही महिन्यांपुर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांच्या संख्येत काही प्रमाणात बदल झाल आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानाकरिता आणल्या जाणार्या ईव्हीएम मशिनमहापालिकेच्या निगडीतील नेताजी सुभषाचंद्र बोस बॅडमिंटन हॉल येथील स्ट्राँगरूममध्ये ठेवल्या जाणार आहेत. तर चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमधून अधिकारी व कर्मचार्यांना मतदानाचे साहित्य वाटप केले जाणार असून, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर याचठिकाणी हे मतदान साहित्य जमा करुन घेतले जाणार आहे. त्यानंतर कडेकोट बंदोबस्तामध्ये या ईव्हीएम मशिन बालेवाडी येथील शिवछत्रपती स्टेडियममधील स्ट्राँगरूममध्ये सुरक्षितपणे ठेवले जाणार आहे.